म.ग्रं.सं. ठाणे
विषय :.....कु.०५
सं. क्र. : २४३२

# कविता

REFBK-0023196
REFBK-0023196

संदर्भ
23१९६
काव्य
2४32
१६५५१

REFBK-0023196
REFBK-0023196

काव्यक्षेत्रातील नव्या दशकाचा आरंभबिंदू

# कविता

संपादक : प्रदीप मुरलीधर गुजर

प्रकाशक
प्रदीप मुरलीधर गुजर
१, सुयोग, रामवाडी, नौपाडा, ठाणे २

© १९८१, प्रदीप मुरलीधर गुजर

मुखपृष्ठ
अरुण ठाकूर ('ए' आर्टस्)
अरुणदर्शन, कोपरी रोड, नौपाडा, ठाणे २

मांडणी
अरुण ठाकूर, प्रदीप गुजर

मुद्रक
प्र० पु० भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो
मुंबई ४००००४

प्रथमावृत्ती
मार्च १९८१

मूल्य पंधरा रुपये

प्रमुख वितरक
बॉम्बे बुकडेपो, २१७, राजा राममोहन रॉय मार्ग, मुंबई ४००००४

## मानकरी


| | |
|---|---|
| अशोक बागवे | १ |
| श्रीकृष्ण राऊत | ६ |
| रामचंद्र वामन कदम | ८ |
| प्रकाश कालेकर | १० |
| राजस कल्याणकर | १५ |
| नीलकंठ कदम | २० |
| हरिश्चंद्र थोरात | २६ |
| श्रीदेवी देसाई | ३१ |
| अरुण म्हात्रे | ३६ |
| नरेंद्र बोडके | ४१ |
| भारती बिर्जे | ४५ |
| वाचा आत्मसिद्ध | ५३ |
| विजया जहागीरदार | ५७ |
| सुनंदा भोसेकर | ६२ |
| अरविंद विश्वनाथ | ६७ |
| पोपट सातपुते | ७१ |
| रंजना विगम | ७७ |
| पुष्पाग्रज | ८० |
| आनंद कुमठा | ८४ |
| रवींद्र दामोदर लाखे | ८८ |


*समीक्षा*
**विजया राजाध्यक्ष**

पुढील सुहृदांचे आभार : शंकर वैद्य, रमेश तेंडुलकर, रंगनाथ कुलकर्णी, पी० सावळाराम, राम पटवर्धन, पु० आ० चित्रे, पुरुषोत्तम पाटील, प्रकाश गीध, डॉ० अरुण जोशी, राजीव जोशी, गुरुनाथ सामंत, वासंती मुझुमदार, दिनकर गांगल, कुमार केतकर, पां० ना० कुमठा, माधव भागवत, प्र० पु० भागवत व मौज प्रिंटिंग ब्यूरोमधील सर्व सहकारी आणि श्री० पु० भागवत.

[ पुस्तकातील महत्त्वाचे मुद्रणदोष खाली दाखविल्याप्रमाणे सुधारून घ्यावेत. ]

पृष्ठ १५ : पहिली ओळ, तिसरा शब्द : अर्धे; दहावी ओळ, दुसरा शब्द : चालता • पृष्ठ २० : पहिली ओळ, पाचवा शब्द : दुःखस्वर • पृष्ठ ४० : एकोणिसावी ओळ, तिसरा शब्द : त्यांच्या • पृष्ठ ६८ : पहिली कविता, सातवी ओळ, चौथा शब्द : सक्ती • पृष्ठ ८१ : कवितेचे शीर्षक : 'नदी' • पृष्ठ ९३ : 'संवाद' या कवितेतील तिसरी ओळ, चौथा शब्द : दुःखासारखा • पृष्ठ ९५ : पंधरावी ओळ, शेवटचा शब्द : करणे

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२४३२
२३९९६
१५५५९
ग्रं. क्र.
काव्य
शाखा (स्थळ प्रत)

# नमस्कार

नमस्कार. ‘कविता’ संग्रह आपल्यासारख्या निष्ठावान रसिकांना देताना मला खूपच आनंद होतोय. मी प्रस्तुत संग्रहापूर्वी ‘कविता’ या नावाचेच लघुअनियतकालिक (Little Magazine) चालवीत होतो. पहिल्या अंकात जाहीर केल्याप्रमाणे व्यवस्थित आठ अंक काढले. अनियतकालिकाचा टप्पा पूर्ण होण्याच्या आधी काही काळ माझ्या असे लक्षात आले की, हे अनियतकालिकाचे माध्यम चांगल्या कवितांच्या प्रसिद्धीच्या दृष्टीने त्रोटक आहे. तेव्हा ह्यापेक्षा थोड्या कमी मेहनतीमधून, काही उत्कृष्ट तर काही चांगल्या कवितांना अधिक योग्य न्याय देण्याच्या दृष्टीने एखादा संग्रह प्रकाशित केला तर बरे होईल.

पुस्तकप्रकाशनाचा विचार माझ्या मनात अनेक कारणांनी आला; त्याचा जरा थोडक्यात ऊहापोह करतो : मी स्वतः लहानपणापासून कविता लिहितो. चांगले कवितासंग्रह वाचत असताना मी स्वतःत अनेक वेळा रंगून गेलोय. आणखी... आणखीन काही चांगल्या कविता शोधण्याच्या नादामुळे अनियतकालिकाला सुरुवात केली. महाराष्ट्र व इतर ठिकाणांहून प्रसिद्ध होणाऱ्या काही महत्त्वाच्या वाङ्मयीन स्वरूपाच्या मासिकांचा गेली किमान चार वर्षे मी वाचक आहे. ह्या माझ्या वाचनाच्या प्रक्रियेमधून मी कवी होण्यापेक्षा रसिकच अधिक बनत चाललो. माझ्या कवितेपेक्षा माझ्या पिढीत लिखाण करणाऱ्या इतर काही कवींची कविता मला अधिक भुरळ घालू लागली. मी एक सामान्य वाचक. तेव्हा काहीतरी गूढ व दुर्बोध अशी कविता मी मनातून नाकारत आलो. वाच्यार्थ व लक्ष्यार्थाने युक्त असणारी साधी, सरळ अशी इतर काही कवींची कविता ही, ‘माझी कविता’ म्हणून मला खुणावू लागली. त्यात भावना होती. खोटा उद्रेक जाणवत नव्हता. आशयानुसार अभिव्यक्ती आणि मुख्यतः लय यांची प्रगल्भता क्षणोक्षणी जाणवू लागली. सत्यकथा, प्रतिष्ठान, अभिरुची, अस्मितादर्श, अनुष्टुभ, लोकवाङ्मय, हंस इत्यादी नऊदहा वाङ्मयीन मासिकांतून, तसेच जवळजवळ दीड ते दोन वर्षांपूर्वी झालेल्या ‘महाराष्ट्र टाइम्स’-मधील कविता-निवडीमधून जे कवी मला मोहवू शकले, त्यांच्याशी मी संपर्क साधला. हे कवी प्रामुख्याने मुंबई, तसेच गोवा, ओरिसा, संगमनेर, चंद्रपूर, नाशिक, मनमाड, मराठवाडा, मध्यप्रदेश, सातारा इत्यादी ठिकाणचे होते. त्यांची संख्या किमान अडतीसपर्यंत जाते. सविस्तर योजना कळविली असतानादेखील काही जणांनी उत्तरेच पाठविली नाहीत. आजपर्यंतच्या अशा प्रकारच्या काही पुस्तकांच्या, इतर

ठिकाणच्या वाईट अनुभवांमुळे माझ्या योजनेकडे त्यांनी पूर्णपणे दुर्लक्ष केले असणार, अशी एक शक्यता संभवते. काही जगांनी काही कारणांमुळे कविता पाठवू शकत नाही म्हणून कळविले. ज्यांनी पाठविल्या त्यांपैकी काहींच्या कविता पसंतीस पूर्णपणे उतरू शकल्या नाहीत. त्यांनी मला मोठया मनाने माफही केले.

आलेल्या कवितांच्या अनुषंगाने विजयाबाईंशी जातायेता गप्पाही मारीत होतो, पण निवडीच्या बाबतीत अंतिम निर्णय माझाच होता. त्यामुळे माझ्या मनात एक रास्त शंकाही डोकावली. ती अशी की, ह्या 'कविता' संग्रहातील कवितांची निवड तर जवळजवळ एकतर्फीच झाली आहे. त्यामुळे त्या इतरांना आवडतीलच असे नाही. म्हणून ह्या कवितांची आणखीन परीक्षा करण्यासाठी मी मुंबईत काही ठिकाणी घरगुती बैठकींमध्ये प्रत्येक कवीच्या तीन-तीन कविता वाचून दाखवू लागलो. काहींना फारच थोड्या, म्हणजे आठनऊ कविता पूर्णपणे कळल्या नाहीत; पस्तीस टक्के कविता फारच आवडल्या; तर पंचवीस टक्के निश्चितपणे बऱ्या वाटल्या. मी अधिक समाधानी झालो. कारण बऱ्या कवितादेखील सापडणे हल्ली दुर्लभ झाले आहे.

दुसरी अत्यंत महत्त्वाची गोष्ट म्हणजे प्रस्तुत कवितांपैकी सुमारे सत्तर टक्के कविता ह्या सत्यकथा, प्रतिष्ठान, अस्मितादर्श, लोकवाङ्मय, अभिरुची, अनुष्टुभ, हंस इत्यादी डोळस मासिकांमधून प्रसिद्ध झालेल्या आहेत. सर्व संपादक व सहसंपादक वेगवेगळे, वेगवेगळ्या दृष्टिकोनांचे. शिवाय महाराष्ट्र टाइम्सच्या मासिक निवडीमधून, तसेच काव्य-लेखनाच्या स्पर्धांमधून सर्वश्री वसंत बापट, शंकर वैद्य, मंगेश पाडगावकर, अनुराधा पोतदार, विजया राजाध्यक्ष, शांता शेळके, रमेश तेंडुलकर, नारायण सुर्वे, वा० रा० कांत, शंकर रामाणी, वसंत आबाजी डहाके, गुरुनाथ धुरी आदि प्रथितयशांच्या निवडीत काही जण एकदा आणि काही कवी तर कित्येकदा निवड झालेले आहेत. ह्या कारणांमुळे, 'कविता'मधील निवड ही एकतर्फी झालेली असली तरी, कविता उत्तम अथवा चांगल्या वाटण्याच्या दृष्टीने सार्वत्रिकता आलेली आहे. अन्यथा वरील मासिकांच्या संपादकांनी व प्रथितयशांनी 'कविता'मधील कवींना इतके जवळ केले नसते, हेदेखील एक सत्य म्हणून आपल्याला स्वीकारायला हवे असे मला वाटते. अर्थात प्रस्तुत कवितांमध्ये काही दोष असू शकतील, पण ते डोळयाआड करावे असे मोठया प्रमाणावर गुणही आहेत. ह्या वीस कवींव्यतिरिक्त आणखी थोडे कवी चांगले आहेत, हे मला माहीत आहे. परंतु एकूण योजनेत सर्वांनाच समाविष्ट करणे जरा अवघड गेले. असो.

अंतिम निवड करताना तसे कोणतेच काटेकोर नियम ठरवले नव्हते. मात्र एक की, अंतिम निवडीसाठी प्रत्येक कवीच्या किमान पाच कविता पसंत पडल्या पाहिजेत असा माझा आग्रह होता. परंतु तीन कवी माझ्या ह्या नियमाला, त्यांच्या प्रत्येकी दोन, तीन, चार कविता खरोखरच प्रगल्भ असल्यामुळे अपवाद ठरले आहेत. पाच कवितांच्या अट्टाहासापायी मी त्यांच्या आणखी काही साधारण कविता उगीच समाविष्ट करीत बसलो नाही. अशोक बागवे यांचे गझल आवडल्या कारणाने, केवळ गझल ह्या 'फॉर्म'साठी म्हणून त्यांची निवड केली. 'कविता दशकाची' संग्रहामधील काही कवी बरे वाटले. परंतु त्यांच्या मला आवडणाऱ्या बहुतेक कविता 'कविता दशकाची'मध्ये समाविष्ट झाल्याकारणाने, पुन्हा त्याच कवितांची केवळ पुनरावृत्ती टाळण्यासाठी मी त्या कवींचा समावेश केला नाही. म्हणून आणखी काही नवीन कवींना मी 'कविता'मध्ये सामावून घेऊ शकलो.

मी स्वतः या संग्रहाचा संपादक असल्याकारणाने माझे गझल मी विचारात घेतले नाहीत. प्रकाशन हा माझा अजून व्यवसाय नाही. पण व्यावहारिकपणामुळे मात्र मला आर्थिक प्रश्न कधी भेडसावला नाही. कवींकडून पैसा घेण्याच्या मी पूर्णपणे विरुद्ध आहे.

'कविता' संग्रहाचे प्रत्येक आवरण हे हाती तयार केलेले (हँडमेड) आहे. एका प्रतीवर असलेली कलाकृती दुसऱ्या प्रतीवर दिसणार नाही. तसेच प्रत्येक प्रतीवर वेगवेगळी रंगसंगती आहे. या प्रकारची एकाच पुस्तकावर विविध प्रकारची आवरणे हे ह्या संग्रहाचे आणखीन एक नवीन्य ठरावे. मनावर प्रतिबिंबित झालेली कवितांची लय आणि त्यांची अनेकपदरी प्रगल्भता मुखपृष्ठांवर चित्रित झालेली जाणवते.

चित्रकार अरुण ठाकूर यांनी 'कविता' संग्रहाची मुखपृष्ठे काढली आहेत. बाईंची (विजया राजाध्यक्ष) सर्व कवितांवरील एकत्रित समीक्षा हा तर दुग्धशर्करायोगच म्हटला पाहिजे. महाराष्ट्रातील ह्या दोन अग्रगण्य व्यक्ती माझ्या जिव्हाळ्याच्या असल्याकारणाने, त्यांचे औपचारिक आभार मानण्याच्या भानगडीत मी मुळीच पडत नाही. त्यांच्या व सर्व कवींच्या, तसेच विश्वासाने प्रकाशनपूर्व किंमत देणाऱ्या सर्व रसिकांच्या सहकार्याबद्दल माझा बेहोष आनंद मात्र व्यक्त करतो.

**महाराष्ट्र व इतर सर्व प्रांतांमधील सर्व समीक्षकांनी, प्राध्यापकांनी, कवींनी, 'कविता' संग्रहामधील कवितांच्या प्रगल्भतेबद्दल अगदी सडेतोड सविस्तर समीक्षा करावी, अशी माझी मनापासूनची इच्छा**

आणि पुनःपुन्हा सांगणे आहे. माझ्या नोंदीसाठी म्हणून, आपल्या समीक्षेचे एक छापील कात्रण माझ्या पत्त्यावर पाठविण्याचा जास्तीत जास्त प्रयत्न करावा. शिवाय सर्व रसिकांनी माझ्याकडे अथवा त्या त्या कवींच्या पत्त्यावर त्यांचा सविस्तर, स्पष्ट अभिप्राय अगदी अवश्य पाठवावा अशी सर्वांचीच इच्छा आहे; जेणेकरून आम्हांला अधिक काही शिकता यावे अशी आमची स्पष्ट भूमिका आहे. रास्त शंका अथवा प्रश्नांना कवी आपल्या प्रत्यक्ष भेटीत अथवा पत्राने उत्तरे देतील, अशी आशा मी बाळगली आहे. शेवटी हा एक मनमोकळा संवाद आहे. आवडलेल्या कवितांबद्दल आपल्या इतर स्नेह्यांना अवश्य सांगून, साहित्यसंस्थांमध्ये अभ्यासपूर्ण चर्चा करून हा संवाद वर्षानुवर्षे वाढवावा अशीही तीव्र इच्छा आहे.

माझे मित्र सतीश काळसेकर यांच्या एका कवितेतील काही ओळी गुणगुणत मी माझे निवेदन आटोपते घेतो :

‘पुस्तके पहात नाहीत
अंथरूण पाहून कसे पाय पसरावेत.’

‘पुस्तके रद्दीत विकावी
हे, प्रेमपत्रांना दूर लोटावे
तसे क्रूर वाटते.
पुस्तकांना वय
शहाण्यासारखे स्वीकारता येत नाही.’

‘ ......
पण पुस्तके कधीही नसतात
स्थावरजंगम मालमत्तेसारखी.
तुम्ही कसेही गेलात फरफटत
त्यांच्या डोळ्यासमोर
किंवा त्यांच्या डोळ्याआड;
तरीही पुस्तके भाकरीसाठी
विकता येत नाहीत.’

आपला सर्वांचाच

**प्रदीप मुरलीधर गुजर**

## अशोक बागवे

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२०३२
२३९८६
७५५८१
काव्य
ग्रंथ शाखा स्थळ

*जळते जवान शोधा*

रक्तातले सखोल आता इमान शोधा.
आता नव्या ऋचांचे पसायदान शोधा.

ज्ञानेश्वरास ज्यांनी गावात नागविले
त्या मूर्ख पंडितांची अवलाद ध्यान शोधा.

फसव्या धनुर्धरांच्या भात्यांत साठलेले
विध्वंस मांडणारे जहरील बाण शोधा.

टोपीत पांढऱ्या जे दडले उनाड रावे
त्यांची खुशाल आता वृत्ती छिनाल शोधा.

मानेत ताठलेल्या त्या पुंड दुर्जनांचा—
जी वाकवील माथा, असली कमान शोधा.

आकाश व्यापणारे उठती बुलंद वारे
श्वासांत सागराचे नवखे तुफान शोधा.

लिंपून भिंत बसले घरट्यांतले गृहस्थ
संसार फुंकणारे वेडे लमाण शोधा.

मातीवरी सुखाच्या विखरून सर्व गेले
माणूस जोडणारा धागा समान शोधा.

कोत्या पराभवाचे वार्धक्य नाव आहे
आता नव्या दमाचे जळते जवान शोधा.

आतल्या षड्जातुनी भोगिला गांधार मी
पांगळ्या ओठांतुनी प्राशिला अंधार मी

मध्यमाची मींड ओली सोसली रक्तातुनी
कोवळ्या फुलांवरी गोंदला अंगार मी

नाद हेलावून गेला छंद आदिताल तो
दोन डोळ्यांतून प्यालो मोकळा मंदार मी

निषाद माझा बोलला की धैवताची देवता
पंचमाच्या वेदनेचा आतला हुंकार मी

मृणालवीणेतून सांडे शब्द ओला या नभाचा
व्योम हे ब्रम्हांड डोले, त्यातला झंकार मी

उदास पसरे सूर इथे मग चिंब नभाच्या खाली
जडावली पंखांत पाखरे दिशा कशी मालवली

इथेच ना मग पानांनी या मौन मिटविले तेव्हा
जळात विझली या झाडांची लव नवथर मखमाली

उरात रुजुनी उरभर झाली एक जांभळी वेणा
त्या जखमांच्या अजून तेवत क्षितिजी गूढ मशाली

संथ तुझ्या केसांत थरारून प्रहर मागचा मिटला
आणिक माझ्या अस्तित्वावर पसरत संध्या आली

उदासतेची काजळरेखा चिंब नभात निमाली
पुसून टाकित खुणा, पुन्हा मातीवर माती ढळली.

ही नशा पण जहरी असते अशा कुसुंबी बहराची
ही निशा पण गहरी असते अशा लाजऱ्या प्रहराची

कुणा न ठावे कुठे चाललो अशा चांदण्या धुक्यात ओल्या;
ही वाट पण बहिरी असते अशा अनोळखी शहराची.

बधीर तू अन् सुन्न पापणी डोळ्यांमधले चंद्र फिके;
ही ओढ पण चटक लाविते लालबुंद त्या जहराची.

पेटे श्रावण उभा असा की आग गोंदतो अंगांगावर;
धुंद आर्द्र ही नगरी असते वादळवेड्या कहराची.

श्वासात मोगऱ्याच्या गेले मिटून कोणी
बहरात पावसाळा गेले खुडून कोणी

हे फूल काळजाच्या पंखांत तोलताना
देठातुनी दिठीच्या गेले तुटून कोणी

स्पर्शाहुनी विभोर ज्याचे मृदू शहारे
मिठीत गोंदताना गेले सुटून कोणी

घेता मनात गिरकी बसला रुतून काटा
जखमा अशा मिठाने गेले चुरून कोणी

स्वर काळजात खोल गिरवून सांगताना
मी गावयास बसता, गेले उठून कोणी...

प्याल्यात थेंब साकी अर्धा अजून आहे;
आणिक आण काही, ओठी तहान आहे.

आले कुठून पंछी असल्या अनाम वेळी;
नाही जुळून आले झाले चुकून आहे.

हातात सावल्यांचे आधार फक्त होते;
जळले उन्हामधूनी, गेले विझून आहे.

डोळ्यात धीर नाही बघण्या उजाड रानी
फुलवेल पापण्यांची खाली झुकून आहे.

भलताच अर्थ होतो बोलून बोल जाता
झाल्या प्रतारणेशी माझे इमान आहे.

मी मागता मिळाले हातावरी निखारे
जखमेवरी फुलांच्या माती मिटून आहे.

खोल आभाळी निळे रावा कुणाचा सांग ना
पंखावरी पाचू नवे, आता तरी तू माग ना

काय डोळ्यांतून तू बंदिस्त केली वीज ही
ये अशी फणारुनी, की डंख मारी नाग ना

मिटून जा कळीतुनी पुन्हा फुलून फूल हो,
क्षणात सखि साजणी, क्षणात हो वारांगना

देह श्यामल सावलीचा उजळुनी कमळापरी
शाहण्या प्रहरातुनी वेड्यापरी तू वाग ना

देहाहुनी देहात होती राधिका संमोहिनी
श्रीरंग देहातीत झाला देह तो निःसंग ना

नाही अजून आले काळोख फुंकणारे
बाणांत विद्ध झाले तलवार जिंकणारे

थडग्यांतुनी मने ही थंडावलीत सारी
नाहीत आज वारे प्राणास चुंबणारे

येथे उरांत सगळ्या झेंडे पराभवाचे
स्वप्नात आज राजे बंडास जोखणारे

नगरी लुटून नेली भलत्याच काजव्यांनी
ते सूर्य रोमरोमी झोपेत पेंगणारे

आसू भरून प्याले त्यांना सुपूर्त केले
हे विष ना परंतु आतून झोंबणारे

आम्ही चुकून केली गमतीत चाल साधी
अडकून त्यात गेले तरबेज खेळणारे

## श्रीकृष्ण राऊत

### *गुलाल*

माझी भकास शिल्पे शोधीत काल होता
तो देखण्या व्यथेचा ऐनेमहाल होता

स्वस्तात फार ज्याने विकले मला अवेळी
गव्हाळ कातडीचा कोणी दलाल होता

आयुष्य आज माझे देते मला शिवी ही :
श्रीमंत आसवांचा तू रे हमाल होता

जिंकून हारलो मी सारेच डाव तेथे
निद्रिस्त प्राक्तनाचा जेथे निकाल होता

वाटा कशा दिसाव्या ? अंधार गोठताना
काळ्याच चेहऱ्यांचा भारी सुकाळ होता

सौभाग्य रेखणारे कुंकूच भासले जे
कोण्यातरी मढ्याचा तोही गुलाल होता.

### *अनुवाद*

बांधून टाकलेली आहे जरी हवा ही
उच्चार वादळाचा तो थांबणार नाही

वारूळ शोधणाऱ्या मुंग्या पुढे निघाल्या
वाटेत पर्वतांनी केली जरी मनाई

हुंकार देत आहे काळोख भोवताली
सांभाळ रे दिव्या तू रंगीत रोषणाई

जिव्हा विकून तोंडे बसली जरी मुक्याने
दौतीत कोणत्याही नाही गहाण शाई

खाऊन घे गिधाडा तू एक प्रेत माझे
अनुवाद भाकरीचा चालू दिशांत दाही !

झेलून घेत थुंकी फळतात फूलझाडे
का मोडक्या घराला छळतात राजवाडे?

पोथीत पेरती हे संदेश लाचखाऊ
आत्म्यास राहण्याचे हे मागतात भाडे!

भिंती चतूर त्यांच्या सांभाळती तिजोऱ्या
पाहून माणसाला ती लागती कवाडे

जिद्दीत काल ज्यांनी वस्ती उजाड केली
गावात त्याच जाता होतात हे नवाडे

केले जरी खुलासे त्यांनी पवित्रतेचे
आतून बाटलेली असतात सर्व हाडे

प्रचिती अगाध ज्यांच्या नाठाळ कुंपणांची
ते हेच सर्वसाक्षी साक्षात कोंडवाडे!

*सर्वसाक्षी*

## *अंतिम सत्य*

जेव्हा इथे दिव्यांच्या गेल्या विझून वाती
आली अखेर माझ्या हातात फक्त माती

श्वासात शाश्वतीचा चमके न काजवाही
अंधार भोगणारी गर्विष्ठ मात्र छाती

सोडून धर्मशाळा ही पाखरे प्रवासी
अज्ञात त्या दिशेने कोठे उडून जाती?

आयुष्य-द्वारका ही जाता अशी तळाला
तुळशीस कृष्ण आता लागेल काय हाती?

पिंडास टाळणाऱ्या सर्वज्ञ कावळ्यांनी
गुंतून ठेवलेली प्राणात सर्व नाती

नीतीस वाव नाही, धर्मास भाव नाही
मृत्यूस काय त्याचे? जाती तशा जमाती

रे दुःख माणसाचे अंतिम सत्य आहे
बाकी मवाळ साऱ्या आहेत जाहिराती!

## रामचंद्र वामन कदम

### सभासद

भविष्याची दैवी अनपेक्षितता अंगातून चमकून गेली
साक्षात्काराप्रमाणे, संगीताप्रमाणे. संगीताप्रमाणे—
अस्तित्वाचं प्रवाही लावण्य मला जाणवलं आणि
त्याची स्वयंसिद्धता; निराकार वस्तूंना लाभत
राहणाऱ्या अनपेक्षित घनतेसारखी.
मी पाहिला भविष्याच्या अनपेक्षिततेचा निरोगी हात
घटनांची सघन शिवण करताना. आणि त्याची
सर्जक किमया—वर्तमानाच्या ओसाड फांद्यांतून
अनपेक्षित पर्णमयता नांदविताना.

आता अनुक्रम जाणवणार नाही, सूर्योदयांसारखा.
सूर्यप्रकाशाचा सतत नवीन पदार्थ आता
आणि वस्तूंची ताजी कठिणता.
आता मी सभासद झालो
अनपेक्षिततेच्या सृजनशील व्यवस्थेचा.

*भर दिवसा*

भर दिवसा, दिवस असतो बहिरा, बहिर्मुख; ज्यात
प्रकाशाची अनावर घाई आणि वाऱ्याची वर्दळ.
जिथे प्रत्येक दिशा बाह्य असते, प्रकाशाइतकी
आणि सगळीच्च दृश्ये बाहेर वळत जाणारी,
उणावणाऱ्या आविर्भावात...भर दिवसा, असे
आयुष्य वजा वजा भरत जाते, दिवसाच्या
भरात. जेव्हा विस्मृतीसारखी व्ययदार वळणे
घेतात या घटना, भर दिवसा.

*संवादाविना*

केवळ घटनेच्या पातळीवरील
वास्तवासारखं हे उन्ह.
आणि मित्रा, आपण बोलतो आहोत.
म्हणजे तू एकटाच बोलतो आहेस
आणि मी एकटाच बोलतो आहे.
मधून-मधून तर्कनियमांचे सोयिस्कर दोरे. चुकून.
क्वचित विनोदाचेही.
आपल्या अनुभवांचं लोखंड आपल्यांतच—
वेगवेगळं, जडजड.
आपण बोलतो आहोत, संवादाविना
आणि हे रेताड उन्ह.
नुसती वस्तू म्हणून हे टेबल
आणि चहाचे डाग.

## दोस्त

दोस्त,
ओलावा आटत चाललाय.
मालवत चालल्येय भेटण्यातली उत्सुकता.
'हाय'मधलं हसू ओठांवर व्यंगात्मक वाकडं होऊन
लटकू लागलंय.
निरोप देताना उद्याच्या आशंकेने थकवा शरीरभर
भराभर पसरत चाललाय.

दोस्त,
संवादाच्या प्रिय क्षणी ओठ गाफील होतात.
शब्दांच्याच भयावह भिंती उभारल्या जातात
आणि गुडघ्यांतून पाय तुटल्यागत
बर्फभुशातून सरकत आपण निघून जातो

दोस्त,
अशातही आपण रोज भेटत आहोत,
याचा अर्थ काय ?

## संभाषण

एक मूठभर संध्याकाळ समुद्रात भिरकावण्याइतकी
सहनशक्ती गोळा झाल्यावर
काल जे आपण बोललो
फार पूर्वीचं आठवून आठवून पुसट पुसट
कल्पनामिश्रित. त्याला आता फक्त
आपण देऊ तेवढ्याच लांबीरुंदीचा अर्थ शक्य होता.

येत्या दिवसांचाही अंदाज घेऊन पाहिला आपण
मधल्या शून्य आवरणावर इच्छाशक्तीचे
सहस्र अश्व भिडवून.
मग आपण काही समंजस भाकितवजा विधानं केली
ज्यांतलं आक्रित अजून आपलं झालं नव्हतं
म्हणून आपले डोळे लुकलुकू शकत होते.
नंतर आपण वर्तमान घडामोडींवर आलो
म्हणजे जे मोडलं घडण्याआगोदरच, त्याबद्दल
किंवा जे घडलं आणि बिघडतच राहिलं, त्याबद्दल
तक्रारवजा जे बोललो
ते केवळ समस्येचं स्पष्टीकरण होतं.

मग आपण कैक पिढ्यांवरचा राग आणि करुणा ह्यांचे
शास्ते झालो. चुपचाप उठलो.
काहीबाही मनाशी ठरवत चालू लागलो.

*समजुतीखातर*

समजुतीखातर की
चाललंय ते बरोबरच आहे
होणाराय ते चांगलंच असेल
गप्प बसायचं.

ह्या गप्पपणातूनच रुजेल
उद्याच्या उच्चारांची नांदी
सुटा सुटा होत जाईल एक एक अबोल.

बोलायचं तेही असंच
की ऐकणाऱ्याला वाटावा सप्रेम हेवा
नि निघताना उठावं ठरवतच
स्वतःचं भविष्य आपल्या वळणांनुसार.

समजुतीखातर मग
आरसा झालेल्या आपल्या चेहऱ्यातलं आयुष्य
हलकेच सस्मित सावरावं.

बाहेर
उजेडाची पावलं फिरताहेत हातकड्या घेऊन
शोधत भूमिगत अंधाराला
आणि शहर दंग अंधारयात्रेत
ज्याचे डोळे खुडून नेले आहेत
उगवतीच्या चंद्रानं.

आता
मुदत संपून गेली आहे
हात वर करून स्वाधीन होण्याची.
तर मग फैरी का झडत नाही आहेत
का शहरच कोसळतंय आत्महत्येच्या टोकावरून
महानिद्रेच्या गोळ्या गिळून...

कात बदलून फसवतंय दर वळणाला
कोण आहे ते...

संबंध

कुठे बसलो होतो आपण ?
असू कुठे तरी.
आणि बोलत काय होतो ?
असेल काही तरी.
पण बोलता बोलता एकाएकी
चिर अपरिचिताप्रमाणे असाहाय्य झालो; आणि एकाकी
तो विषय तेवढ्यावरच संपला.

नंतर आपण तो तेवढा विषय वगळून
बरंच काही बोलत राहिलो,
ज्यातून उरू लागली किंचित उद्याची
उत्सुक बाकी.

बोलायला काहीच नसेल तेव्हा
नंतर आपण त्या विषयाची आठवण काढून
हसू शकलो.
सुरू होण्याआधीचं एक संपलेपण
जपू लागलो.

कोण निघून गेलंय इथून
कोण येणारंय परतून कुठून
अरे
कोणी तरी येऊन हवेत उंचावलेला माझा हात
खाली करून तरी जा ना.

ही वादळं ओसरून जाईपर्यंत
चिडीचूप पडून राहिलं पाहिजे
नंतर पडझड झालेल्या घराच्या सांगाड्यांतून
स्वतःला सोडवून घेत उभा राहीन.

ती तर अजून रंगून गुंगून
त्याच त्या भातुकलीच्या खेळात
तिच्या ओठांवर बोल अजून रेंगाळून
तेच ते काऊचिऊचे

तिच्या भोवती पण रान उंच उंच
उभ्या-आडव्या वाढणाऱ्या वयाचे
ती त्यात अगतिक गुदमरून
बंद तिच्या ओठांवर उभा प्राण बुजून

कसे तिला कसे तिला वाचवू मी
रानाच्या या धाकातून
ती तर अजून खेळ मांडून
ती तर अजून खेळ मांडून.

—— राजस कल्याणकर ——

शिकस्त करूनही अध उरलेले काम
पर्समध्ये कोंबून
तिने घराच्या दिशेने पावले चालवली.
अर्धा रस्ता पार केल्यावर
तिला धाप लागली.

तिच्या डोक्यावरचे केसही
अर्धे उजळ झालेले—
अर्ध्या सरलेल्या आयुष्यातली
अर्धीमुर्धी सुखं भोगताना.

चालता चालत
तिने क्षणभर विकलतेने मस्तक पाठीशी ढाळले,
तर आकाशात चंद्र—
अर्धवट चघळलेल्या गोळीसारखा...

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२०३२
२३९९६
१६।६।८९
काव्य

बाहेर धुमश्चक्री.
हवा त्वेषाने तट्ट झालेली.
जणू जिवंत हत्यारे अशी लढणारी शरीरे.
काळजात घुसणारे जिभांचे तेज दांडपट्टे.
मी दार बंद केले.
शरीरातली मस्ती लहान मुलासारखी
दम देऊन गप्प बसवली.
डोळ्यांच्या मशाली काजळ भरून शांतविल्या.
चवताळलेल्या केसांची अलवार वेणी वळली.
वर शोभेसाठी एक नाजूक फूल.
रक्तरंगले कपडे उतरवून हलकी हलकी झाले.
नुकतीच शेवटची परीक्षा देऊन आल्यासारखी.
विश्रब्ध.

कोणी माझे हृदय तेवढे काढून
बाहेरच्या कोलाहलात नेऊन टाकील काय ?

तू आत आलास,
तेव्हा माझं सामान मी बांधून ठेवलं होतं.
रिकाम्या घरातून मारावी शेवटची व्याकुळ फेरी—
तशी एकवार पाहून घेतली होती,
माझ्या आतली सुनी वसाहत.
सगळी खिडक्यादारं घट्ट लावली होती—
जबर दरोडा पडून गेल्यानंतर सुचलेल्या शहाणपणासारखी.
आणि आता निघणार—
एवढ्यात तू आत आलास.
जाताजाता अशी कुठली बिळं बुजवायची राहून गेली होती ?

हे विसराळू शहर.
सहलीला यावं तसे अधूनमधून इथे येणारे आपण.
इथल्या सगळया फुलांचे रंग वारंवार बदलणारे.
इथे सूर्य उगवेल,
ती पूर्व असेलच असे नाही.

आपण येतो तेव्हा शहरात दिवाळी असते.
पण दिवाळीत किती दिवे उजळले,
आणि किती जळले—
ते शहराच्या लक्षात राहील असेही नाही.

असे सगळे असताना
माझे इथले प्रत्येक पाऊल छिन्नीचा घाव घालणारे—
शहराला
ठसे जपणे जमत नसताना.

इथे आले की मी शोभून दिसत नाही या शहराला.
तुला.
कारण— वाऱ्याने वाऱ्यावर लिहावेत,
तसे लेख अंगावर मिरवणारे हे शहर,
नि त्यातून शहरभर फिरताना
निरक्षर होत जाणारा तू!

विजनात जोडलेली प्रेयसी
विजनातच तोडून टाकावी एका घावात.
भर वस्तीत आणून
क्रमशः छाटू नये तिला बघ्यांच्या गर्दीत.
जर मध्येच कुणी उचलला एखादा ताशीव ढलपा—
स्वतःच्या म्युझियममध्ये जपण्यासाठी,
तर सबंध प्रेयसीलाच तू बेइमान ठरवशील,
आणि स्वतः मात्र
ना विजनाचा रहाशील; ना वस्तीचा.

ठरवले की तुझ्यावर प्रेम करायचे.
प्रथम तुला सबंध आखून घेतले.
तुझे सगळे प्रदेश—
तुझ्या आकर्षण-कक्षा—
तुझ्या हातांचा उभा-आडवा आवाका—
तुझ्या हृदयातून निघालेल्या धाग्यांची दुसरी टोके—
ज्यावर तू प्रेम करतोस,
ते सगळेच माझे प्रेमविषय झाले.

मला स्वतःवरही प्रेम केले पाहिजे.

त्याच्या जन्मापासून
त्याच्या खांद्यावर रुतून बसलेल्या झोळींत
त्याने ठेवलेले असते पोट--
आपले, आईचे, भावंडांचे.
त्यासोबत जपलेली एखादी कविता—
पाठ फिरविणाऱ्या प्रेयसीसाठी.
झोळीचे ओझे त्याच्या खांद्यावर
जन्मखुणांसारखे घट्टे पाडणारे.

एखाद्या आपल्याशा वाटणाऱ्या दुपारी
त्याच्या अकाली अधू होत चाललेल्या डोळयांनी पहात
तो सांगतो :
'पैशांची गरज फार मोठी असते.'
त्या वेळी माझ्या गाठीचा सगळा पैसा खोटा ठरतो.
हातातल्या सुखासीन कॉफीच्या पेल्यात
मला न पेलणारी वादळे उठतात.

मोहोरफुलल्या झाडावर हींव पडावं—
तसं त्याचं आयुष्य;
नि माझे मोहर तकलादू परीकथेतल्या राजकन्येचे !

## नीलकंठ कदम

### सहा तारांवर छेडलेले....

सहा तारांवर छेडलेले सहा दुःखस्व
तू ऐकवलेस पडक्या किनाऱ्यावर नि
तुझ्यामाझ्यातले खाजगी संबंध
म्हाताऱ्या माणसासारखे
थरथरत निघून गेले.

खूप बोलल्यानंतरच्या
विलक्षण थकव्यासारखं तुझं आयुष्य नि
निवांत रात्री तू उघडलेली त्याची सगळी दारं
"निवांत रात्री आपण इतके
खाजगी असतो का रे ?"
स्वतःच्या डायरीशी
स्वतःच करावा आत्मसंवाद
तसं तुझंमाझं बोलणं नि
परस्परांना प्रश्न विचारणं.

हे जे चंद्रविरहित आकाश
ज्याच्याविषयी मी तुला काहीच
सांगू शकत नाही किंवा
अधिकाधिक
आत्मकेंद्री होत जाणाऱ्या माणसासारखा
हा समुद्र
त्याच्याविषयीदेखील
आपण काहीच बोलू शकत नाही.
जीर्ण वास्तूचा निखळावा एकेक ढलपा
तसे तुझ्या आयुष्याचे हे निखळते संदर्भ नि
या किनाऱ्यावरचं माझं हे असं विकलपण.

गच्च गर्दीत अलगद मिटावेत थकीव डोळे
तशी आपली ही भेट आणि
निघताना तुलामला गवसलेली
एवढीच अपरिहार्य परिणती.

*कविता*

किती
सराईतपणे पार पाडतो
तो त्याचे सर्व व्यवहार !
डोळ्यांवर पेंग घेऊन
उचलावीत पावले
ओळखीच्या रस्त्यावरून
तसे.

सगळे दिवे मालवून आलेल्या संध्याकाळी
तो शोधतो मित्रांना
बागांमधून, समुद्रकिनारी नि
नेहमीच्या पायवाटेवर.
लुब्र्या नजरेसारखं आयुष्य घेऊन
तो वळतो मैदानाजवळून
तर
मैदानात मुलांचा ओळखीचा खेळ
रिंगणातल्या मरणोन्मुख
पाखराला ढोसण्याचा.

## *माझी असंख्य दुःखें*

माझी असंख्य दुःखं
मनाच्या पेटीत बंद करून
जेव्हा मी या वळणावर वळतो
तेव्हा मागच्या सगळ्याच
वळणांचे संदर्भ तुटलेले असतात
आणि
हरएक वळण
दूरस्थाप्रमाणे एकटेच उभे असते.

तसे याही वळणावर
आठवतात तुझे बांगड्यांचे
किणकिणणारे हात.
आणि
माझ्यात विझून जातानाचे
तुझे थकलेले निःश्वासही.

तशा
याही वळणावर
आठवतात
तुझ्यामाझ्यात हरवलेल्या संध्याकाळी
आणि
माझी कितीतरी
स्वप्नफुले घेतानाच्या
तुझ्या रित्या-रित्या ओंजळीही.

या देण्याघेण्याच्या तडजोडीतच
आपण स्वतःला विसरून गेलो
आपल्या नकळत
आपआपल्या वळणांचेच झालो.

## *ते तिघे*

जवळचे शब्द संपून गेल्यानंतर
ते तिघेही
स्वतःच्या परक्या होत चाललेल्या
सावल्या न्याहाळीत उठले.

एकाने
तिथल्या गवतावर सांडल्या होत्या
शांत होत चाललेल्या कवितेच्या ओळी.
दुसऱ्याने
प्रेयसीने दिलेल्या
निःश्वसितांमधली काही निःश्वसिते.
तिसऱ्याने
थकून विरलेल्या दिवसाचे काही तुकडे.

तिठ्यावर वळताना
तिघांनी एकमेकांकडे पाहिले
रस्ते विसरल्यागत नि
समोरचे रस्ते अपरिहार्यसे समजून
ते त्यांची
सोबत करू लागले.

*ती मुलं*

धूसर काळोखात ढिगाऱ्यावर
ती मुलं
काहीतरी शोधताहेत.
उत्खननात सापडावेत जुने अवशेष
तसे त्यांचे लिंपलेले चेहरे.

काय बरं शोधताहेत ती मुलं ?

आकाश आता डोक्यावर आलंय.
माणसं येताहेत, जाताहेत. अलिप्तपणे.
ढिगारा वाढतोय.
फाटकी पोस्टर्स, उष्टावळ्या बाजूला सारीत
ओणवी होऊन
मुलं अजूनही शोधताहेत.

मी माझ्या
चौकोनी खिडकीतून पहातोय
संध्याकाळ
विस्कळीत होऊन ओघळतेय ढिगाऱ्यावरून.
मुलं चुरचुरणारे डोळे चोळताहेत
हताशपणे.

मुलं अदृश्य तर होणार नाहीत ना
ढिगाऱ्यात ?

*स्वतःच्या समजुतीकरिता*

आपण चालत राहतो
कुणीतरी भेटेपर्यंत.

भेटतं.

थांबतो
रेस्टॉरंटच्या आसऱ्याला
किंवा वळचणीला
प्रश्नांच्या सोबतीनं.

स्वीकारतो
समोरच्या डोळ्यांमधलं
थंड आयुष्य
ताणतो रबरासारखं
आपलंही भूतवर्तमानभविष्य
स्वतःच्या समजुतीकरिता.

आपण उठतो
एकमेकांमध्ये
पारदर्शी काच उभी करून.

## हरिश्चंद्र थोरात

आपणच आपल्या बाहेर पडल्यानंतर
येणारं परदेशीपण...

या परदेशचे रस्ते कुठून सुरू होतात?
आणि नेमके कुठं संपतात?
काही कळत नाही...

समजत राहतो आजूबाजूला
अस्ताव्यस्त पसरलेला अनोळखी प्रदेश.

आपलाच चेहरा कधी कधी
समोरून निघून जातो
तर त्याला साधी 'मॉर्निंग' म्हणण्याइतपत
ओळख पटत नाही.

ओळख पटत नाही
त्याला आपला चेहरा कसं म्हणायचं?

शाश्वत निळ्या रंगाचा आभाळतुकडा
एवढीच खूण...
काल रात्री तीही चोरीला गेल्यापासून
माझं एकाकीपण होत चाललंय
पुसट पुसट अनोळखी!

अशा उदास रात्री आपल्याच प्रेतापाशी मुकाट्याने बसून रहावे
रोमन आकड्यांवरून सरकतात काटे म्हणून आयुष्याला जगतो म्हणावे
मुकाट्याने ढाळले अश्रू तरीही टपटपतात थेंब आवाज झाल्याशिवाय
रहात नाही
म्हणूनच त्याला डोळे केले दान तर तेवढ्यावरच त्याची भूक
भागत नाही

तो येतो
पांढऱ्याशुभ्र अश्वावरून
उन्हाची आरसपानी वस्त्रं लेऊन
मला दिसतात त्याने
त्याच्या शुभ्र मंदिलात खोवलेली काळीभोर पिसे...
अशा उदास रात्री तो ठेवून जातो मंदिलामधली काळीभोर पिसे
उसवतात साऱ्या शिवणी, ओघळतो काळोख, सैरावैरा होतात
काळेशार ससे
डोळे दान केले तरी काजव्यांच्या प्रकाशवेणा डोळ्यांपाठीमागे
सलत राहतात
काळोख दाटून आला तरी आतल्याआत उन्हाच्या सावल्या
कलत राहतात

तो येतो
पांढऱ्याशुभ्र अश्वावरून
उन्हाची आरसपानी वस्त्रं लेऊन
त्याच्या हिमशुभ्र दाढीवरून
ओघळतात दवाचे थेंब
डोळ्यांच्या खोबणीत जमा होत जातात
आणि मग तो उतरून ठेवतो त्याची वस्त्रं मंदिलासह, निघून जातो
माझ्याच पावलांचं रूप उसनं घेऊन सरळ रेषेत नाहीसा होतो
अशा उदास रात्रीही मग त्वचेखाली रक्तफुले फुलतच राहतात
सरतात युगामागून युगे तरीही डोळ्यात युगारंभ उगवत राहतात.

एक
आख्खं
निळंभोळं आभाळ
डोळ्यातल्या डोळ्यात साचून
कुजून गेलं.

: डिसेंबरच्या थंडीत आपसूक गळून पडलेली अगणित पानं
: पापण्यांशी धडका घेऊन घायाळ होत आत पडलेले रंगविटके रावे
: दलदलीच्या प्रवासात शेवटपर्यंत बरोबर राहिलेला कुबट चिखल
: दिवसादिवसाने खचत गेलेल्या एका अपूर्ण शहराचे उद्ध्वस्त अवशेष

असं काय-काय जमायला लागलं
तेव्हा ते गोरंमोरं झालं
असावं.

मग मी एक पांढरंशुभ्र वस्त्र
डोळ्यांवर अंथरलं आणि शांत मनानं
त्यांची दफनक्रिया पार पाडली.

*मोकळी कविता*

हे गजबजलेलं शहर. रस्ते. माणसांनी भरलेले.
मोठ्या इमारती. छोट्या इमारती. बंगले. झोपड्या.
बागा. प्राणिसंग्रहालये. दवाखाने. शाळा. कॉलेजे.
या सगळ्यांत पुन्हा पुन्हा माणसे. माणसे रस्त्याने
अचानक धडपडणारी. धावणारी. चेंगरणारी. घड्याळाकडे
रागाने, केविलवाणी बघणारी. वेगवेगळ्या वासांची.
घामट. ओशट. पावडरी सुगंधित. सेंट शिंपडलेली.
बिनवासाचीही.
हे सगळं जमेस धरूनही आपण मोकळेच.
सगळ्या बाजूंनी. कोठेच दिशा नसतात. सीमा नसतात.
अंधार नसतो. प्रकाश नसतो. ग्रह नसतात.
तारे नसतात. हवा नसते. जमीन नसते.
पाणी नसते. काहीच नसते.
सगळी पंचमहाभूतं म्हणजे फसव्या
बाजारबसव्या असतात घडिभर दिसणाऱ्या.
आपण काय करतो तर कोणाची तरी
आठवण म्हणून महाल मकबरे बांधतो.
शहराच्या बाहेर बुलंद दरवाजे उभारतो. कोणाला तरी
लिहिलेले पुस्तक अर्पण करतो. कोणासाठी तरी
दाढी वाढवतो. किंवा काढतोही. कोणीतरी
मेल्यावर वर्तमानपत्रात लेख लिहितो. घरं बांधतो.
पहिली मनातल्या मनात नंतर जमल्यास
प्रत्यक्ष बांधतो. कोणाची तरी मोडतो. भांडतो.
हसतो मिळालेल्या विजयावर.
क्वचित् रडतोही.
जमवून घेतो. तडजोडी करतो. सौदे करतो
कोणाशी तरी जो माहीत नाही. आपल्याच
अकलेवर खूष होतो. सुखरूप राहतो.

नंतरच्या संतत एकांतात आपण आपल्याला
सापडत नाही. आपले हात नाहीत. पावलं
नाहीत. खुणा नाहीत. आपण होतो
कृष्णकमळाच्या अजस्र पाकळ्यांच्या
सतत मिटण्याचे बळी. आपण ते मिटणेच होतो.
मिटतो. आतल्या रंगहीन काळोखात काळोखासह.
हे जमेस धरूनही आपण मोकळेच असतो.
सगळीकडून. सर्वस्वी.

बहुतेक, रात्री पावसाची सर येऊन गेली असावी
स्वप्नात राजकुमारी येऊन जावी तशी
निर्मळ नितळ उन्हं वाऱ्यावर फिरून
आल्यासारखी, ताजीतवानी,
झाडं ओलेती, डोक्यावरून पाणी घेऊन न्हालेली,
पानन्‌पान विजेनं सळसळल्यागत,
पराभूत सेनानीसारखी गाऱ्यात खचलेली घरं
तीदेखील आत खोल हिरवी ओल पोचलेली.

माझ्या या ठिबठिबणाऱ्या, दाटल्या प्राणांजवळ
एक दिवा
आणून ठेव खात्रीचा, आधारासाठी.
अजून वाटतंय मी वावरतोय त्या
काळ्याकुट्ट स्वप्नातच.
—कारण पुढं राजकन्येचा खून झाला
आणि स्वप्नभर रक्ताच्या चिळकांड्या उडत राहिल्या
अंगावर.

## श्रीदेवी देसाई

या गडद जांभळ्या अवेळी
मी कवेत घेऊ पाहते
तुझे-माझे सगळे दृश्य-अदृश्य नाते.

असा भन्नभन्नाट वारा...
आणि सोबतीला विखुरलेले केस...
मला अजिबात कळत नाहीये
माझ्या हातांवरची तुझी अबाधित पकड.

रोज संध्याकाळी गच्चीच्या कठड्यावरून
मी वाकून वाकून पाहतेय,
दरेक दिवसागणिक शेंदारत जाणारं
हे गुलमोहोराचं झाड !
तशी आजूबाजूला उन्हाने झाकोळून गेलेली
इवलाली रोपटी थरथरणारीच आहेत.
...हे असलं दुटप्पी प्रेम उन्हाचं
मला नक्कीच साहवणार नाही.

इथे अशी काळ्या-पांढऱ्या पिसांची पाखरं
नेहमीच किलकिलतात.
एखादं पाखरू एकटंच भरारत जातं
आणि किती चटकन
आपण आपलं उनाड हळवेपण,
त्याच्याशी जोडून घेतो.

तुला आठवतात नं
लहानपणीचे लपाछपीचे खेळ ?
असले संदर्भ लागतातच का
नवीन आयुष्याची मूठभर कोडी उलगडताना ?

राजा, मी भरभरून वाट पाहतेय
तडतडणाऱ्या पावसाची...

हा संधीप्रकाश संथ जगू देणारच नाही का?
मला सगळंच असह्य झालंय रे,
किती दिवस इंद्रधनुष्याचं कौतुक?
आसुसल्या नजरांसाठी एकदा तरी
रुखसुकं आभाळ बनू दे ना!

वाट पाहू नकोस...असं
तेव्हाच बजावून निघाले होते.
आपल्या पावलांना जेव्हा आपण
परके सोबती समजून वागवू लागतो,
तेव्हा पायाखालच्या वाटेचा तरी भरवसा
कोणी द्यावा?
...कोणत्याही शक्यता नाकारता येत नाहीत.
आत्ताच बघ,
तुला पंखांचे वेध लागलेत,
नि मला
पाय कापल्यानंतरच्या वेदनांचे!

एका निःसंदर्भ ओळीला वाचणारे माझे डोळे
मध्येच का थांबावेत?
अन् त्यांनी का मोजावेत
पानापानांवरून ठिबकणारे थेंब?
घनदाट जंगलातून बाहेर पडलेली नाचरी वाट...
मृत्युंजयी पाउलखुणा जपणारी.
आणिक वरचा एक निळा नितळ तुकडा...
पाखरांच्या पंखांचे उडते गालबोट नसलेला.
सगळ्यांनाच इतकं निर्व्याज कसं राहता येतं?—
याचा हिशेब मांडणारी माझी बोटं.

धुळीतच आपला माग ठेवून जाणाऱ्या सावजाची
शिकार फार लवकर होते;
—हे मला स्वीकारायला हवंय!

नितळ कोरीव संगमरवरी
पुतळ्यासारखी
आखीव घाटदार ती.
चेहऱ्यावरचे, मधुमालतीच्या परागागत
पसरलेले डोळ्यांचे आकार.

पावलोपावली चंद्रखुणा मिरवत जाणारी
ती एक राजकुमारी.
तिची अधीरी नजर,
टपटपत येणाऱ्या राजपुत्रासाठी
झुरणारी जणू.

असं सारखं वाटतं—
पावसाच्या उभ्या धारेत तिला धरली
तर
तीही एक टपोरथेंब बनून ठिबकेल,
बटाबटांमधून
काळ्याकरंद !

विझू घातलेल्या अंगारांगत
तिचा श्वास अंगांगातून
भिनत गेला.
अशा वेदनांचे हवेहवेसेपण
मी नाकारत नाही.

तिच्या गजाली डोळ्यांमध्ये
असलेल्या मुक्तछंदाचं व्याकुळपण
लपविण्याची धडपड तिची
……
सारा पराभव स्वीकारलाय मी,
तिच्याकडे बघणे सोडून !

इतिहासाच्या साक्षी देत उभ्या असलेल्या
वास्तूंवरून किरणं संध्याकाळी
उतरू लागतात,
तेव्हा खरं तर
त्यांच्या सोनछटांनी फारसं कोणाला
भुलवलेलं नसतं.
त्या वस्तूंना देखील किरणांचं अगत्य
असतंच असं नाही.
दिवसभर ती आपली अंगाखांद्यावर
खेळतात,
एवढीच जाणीव.

कधीकाळी होणाऱ्या भूकंपासाठी
आपला पाया
पक्का आहे,
असा दिलासा शेवटी त्या
उनाड किरणांकडून
त्यांना मिळवावा लागतो.

सगळ्याच ताठ सांगाड्यांमध्ये
मजबूत हृदय असतं तर—
कबरींची जरुरी का पडली असती !

ह्या शहराच्या शहाण्या रस्त्यांची गुंतवणूक
एकमुरी !
माझ्या कळसूत्री बाहुलीची अबलख हालचाल
त्यातून दिसते मित्रांनो.
इथे प्रत्येक दिवा एक चिरेबंदी किल्ला.
आणि ह्या मौन सुसज्ज पेपरवेटात
मी पाहातोय माझ्या पराभवाचे एकतर्फी उत्सव.

तुम्ही पाहता
खिडकीची शेवटची फटही झाकून घेता तेव्हा
काळोख होताना
एक फेसाळ मद्याचा ग्लास आणि
तुम्ही त्यात बुडालेले खोल
आतून-बाहेरून ?
रक्तात पसरून राहिलेल्या मातीच्या गाडीचे
आवाज ह्या शहरातल्या बराकींसारखे
सरळसोट.

तशी एखाद्या व्याकुळ पहाटे
नुक्ती न्हाल्यासारखी एक गर्भार रात्र
येते जवळ बेगुमान.
काचेवर वाजणारा पाऊस ओला असतो फक्त काचेपुरता
त्या वेळी मी कसा उघडणार
पागोळ्यांचे दार आता ?
समोरच्या पिंपळपानांत अडकलेला
एखादटुसरा पक्षी
केव्हाच घेऊन गेलाय माझ्या डोळ्यांची
आतल्या आत वाजणारी झुंबरे !
मित्रांनो,
तुम्ही हे तरी पाहिलेत ?

एका विस्तीर्ण सभागृहाच्या एका कडेला
मी बसून आहे कधीचा.
उद्ध्वस्त खांबावर त्याच्या मरणोत्तर
शिल्पाची वेळ कोणीतरी नुक्ती लिहिली.
मी आलो त्या पोकळीवर
माझ्या पाठोपाठ ठेवला गेला जडभक्कम हात.
आणि त्याबरोबरच मी विसरलो
अगोदर पाहिलेले सर्व;
सरळ आखलेले रस्ते, ओसाड राने, काळ्या काचांची
घरे, आरपार चेहरे आणि घंटा नसलेले संदिग्ध गाभारे.
(जुने संदर्भ, का कुणास ठाऊक,
आठवावेसे वाटत नाहीत.)

डोळ्यात जसाजसा काळोख वाढत चाललाय इंचाइंचांनी
तसा त्याच्या पुसटशा चित्रावरचा मिणमिणता काळोख.
कोणाच्या तरी पराभवाचे गुपित सांगावे
तसे सात्त्विकभाव डोळ्यात आणून
तो मख्ख बसलाय.
बहुधा मिटल्या डोळ्यातून पाहातोय तो
माझ्या मरणाचे हिशेब चुकलेले नि
दिशांची शापमय गाणी.
त्याला ठाऊक आहे?—
तो उठून गेल्यावर त्या कागदी सिंहासनावर
मी प्रचंड शिळा होऊन विराजमान होईन ते?...

पण त्याच्या अस्तित्वातून निघालेली
ही रक्ताची लांबलचक धार
माझ्या पायाशी येऊन थांबली
हे काय आहे?

तुझ्या धपापत्या जाणिवेत
ऊन होऊन झिरपावे प्रहरभर
तर डोळ्यांची छप्परे गच्च उसवलेली असतात.

खिडक्यांतून सांडणारा संदर्भकाळोख
तुझ्या दिशाहीन आकाशावर लिपघून टाकला
अगोदरच;
म्हणून शब्द झाले परतीच्या वाटा फक्त.

माझ्या अस्तित्वाला पडलेले प्रचंड खिंडार
कळत कळत कळत आतल्या आत.
आणि माझे रक्तबंबाळ हात. पाय. शरीर. शब्द.
दुःख. रस्ते. गाभारे.
तळयाभोवतीचा पार...तळे. जाळी कमळांची.

तुझ्या लोणकढी (?) पावसात
ढिप्प भिजवून टाकली
माझी अवखड वासना.

उन्हाचा पाऊस रिमझिमतोय
टपटप पाचोळ्यातून कधीचा
आणि तू गप्प डोळ्यांनी
त्याच त्याच गोष्टी आठवतेस;
खरे ना?

तू आता तर गुणगुणत होतीस कानाशी
पहाटेचे शब्दहीन गाणे...
आणि मी उसवीत
माझ्या तळाशी बसलेली
मुक्या पक्ष्यांची गावे मैलोन्‌मैल...
तुझ्या पावलांवरचे रक्त देखील साकळले नव्हते अजून
सुरांच्या विरंगी जखमांचे,
तुझी थबथबलेली हाक ऐकूनच धावलो बेभान

पण म्हणजे तू हाकारले नव्हतेस कुणाला;
मग मला ऐकू आले ते काय होते?
आकाशाच्या फांद्या तूच नाही का तोडल्यास
माझ्या समक्ष!

परवा रस्त्यात थांबून मी पोस्टरवरचा
एकसुरी समुद्र न्याहाळीत होतो
त्या वेळी
डोळ्यांच्या आत छपवलेला
एकच एक आरस्पानी सूर्य ओरबाडून घेतलास तू
माझ्या तळाशी बसलेली मैलोन्‌मैल गावे
एक प्रचंड अर्थबंबाळ लाट झालीत ग

तू आता गुणगुणत होतीस कानाशी
त्या गाण्यांचे नंतर काय झाले
सांगशील?

ती म्हणाली म्हणून
रक्तातून चीत्कारणारी पांढरी पाखरं
परवा रात्री पलीकडच्या उद्ध्वस्त रानात
दिली मी हुसकावून.
        पावलांच्या मर्यादा संपल्या की
        गळल्या पानांचे नशीब होऊन रहावे
        हे माझ्या पाखरांनी तेव्हाच ओळखले.
त्या रात्री
वाट विसरलेल्या प्रवाशाने एका कोरीव धर्मशाळेशी
आपले दैव उघडावे,
तसे मी माझ्या दुःखाचे सुटसुटीत गणित मांडले.
तिच्या पावलांच्या स्पर्शखुणा
आणि तपस्वी डोळ्यांच्या अगणित संख्या,
गणिताची रीतही जुनी
तिनेच सांगितलेली.
        गणित सुटले
        आणि माझा गाणारा चेहरा जळून गेला...
पहाट होण्यास थोडा अवकाश आहे
तोच पाखरांनी त्याच्या पंखांचे
विरक्त शाप माझ्या झोळीत टाकले.
ती म्हणाली म्हणून हुसकावलेली
पांढरी पाखरे
आता माझ्याच वळचणीला रांगत असतात
मीच माझे उद्ध्वस्त रान झालो म्हणून!

—— नरेंद्र बोडके ——

### बालखेळांची कविता

एक खेळ असा :
कागदाचा एक मोठाला तुकडा घ्यायचा.
त्यावर दोघांनी उभे रहायचे.
नंतर कागद दुमडायचा.
कमी झालेली जागा दोघांनी वाटून घ्यायची.
दुमडता दुमडता
जेमतेम एकाचा पाय राहील एवढाच कागद.
मग कुणातरी एकाचा पाय त्यावर
आणि दुसरा आपसूकच फेकला गेलेला...

फेकला गेलेल्यासाठी आणखी एक खेळ :
डोळ्यांवर पट्टी बांधायची.
आपल्या अत्यंत आवडत्या वस्तूंचा खजिना समोर मांडून ठेवायचा.
हातांचा नागोबा करून त्याचे रक्षण करायचे.
इतरांनी खजिना पळवण्याची शर्थ करायची.

खजिना जावो वा राहो.
डोळे सतत बांधलेले
आणि हातांची झुलणारी नागफणा...

अपरात्री फुलांनी दचकलेले
चाफ्याचे झाड
मातीच्या कणांनी
जोजवली नाही आपली सावली
म्हणून खंतावलेले.
वारा प्यालेल्या वासराप्रमाणे
झाडाच्या फांद्या उभ्या-आडव्या, वर-खाली
किंवा उंच होत गेलेल्या
अगदी टोकाशी
घराच्या रिकाम्या खिडकीशी
दबा धरून बसलेल्या.

*अपरात्री फुलांनी दचकलेले*

## सूर्यफूल

मनात फुलून आलो
त्याची सुगंधसकाळ
चुकार क्षणांच्याही चेहऱ्यावर लख्ख उमटली.

कधीतरी फरशीतून गरम झळा येऊ लागल्या.
अंगभर झाल्या.
कुणीतरी सूर्य मातीत चिणला असावा...

मनात पूर्ण उमललेले सूर्यफूल
जराही दचकले नाही.
त्याने फक्त मातीच्या दिशेने मान तुकवली.

जगण्या-मरण्याच्या दरम्यान
अणकुचिदार भाल्यांचे एक कुंपण असावे
अशी माझी खात्री आहे.

## ढगावरून चंद्रकोर

जन्मभर भाल्यांना मिठी मारून लटकत
समोरून सरकणाऱ्या मृत्यूकडे बघणे म्हणजेच जगणे.
जगता जगता प्रत्येकजण आपापल्या फलाटाच्या शोधात.
फलाटे तुडुंब भरून वाहतच राहतात.

मी माझा म्हणून एक फलाट पकडतो.
त्यावरील बाकावर बापुडा बसतो.
सिगरेट पेटवतो.

रुळावरून चंद्रकोर
दात विचकल्यासारखी सरकते...

## म्हातारी

रेल्वेत माझ्यासमोर
बसलेली एक म्हातारी
समोरच्या खिडकीतून पहात होती
बाहेरचे धुरकट आकाश

तिच्या पापण्या
आंब्याच्या सुकल्या बाठीसारख्या कोळपटलेल्या
आणि ओठ उन्हाच्या दंशाने कोवळी फांदी जून होताना
व्हावी तसे पिळवटून निघालेले.
अख्ख्या चेहऱ्यावर रेषारेषांचे काटेरी जाळे

मी तिच्या चेहऱ्यावर नजर लावली
तर डोळे दुसरीकडे हलेचनात.

जणू कुणीतरी धूर्तपणे लावलेल्या जाळ्यात
मी व्यवस्थित अडकलो होतो...

## फुलपाखरू

झुलत झुलत फुलपाखरू
माझ्याही बागेत आले.
त्याच्या पंखांचा पुसट जांभळा रंग लागून
चारदोन फुले गाली तीट लावल्यागत
साजिरीगोजिरी हसली.

बागेच्या मध्यभागी धावत्या घोड्याचा एक पुतळा.
फुलपाखरू घोड्याच्या पाठीवर बसले
तर काय आश्चर्य !
घोडा जिवंत झाला.
त्याने नाकपुड्या रुंदावून हवा आत घेतली.
शेपटी फुरफुरवली. खूर उडवले.
त्याच्या खिंकाळण्याने
घुंगूर रुमझुमावे तशी हवा हिनकळली.

घोड्याच्या डोळ्यातले फुलपाखराचे प्रतिबिंब
माझ्याही डोळ्यात उतरले.
दोन्ही डोळ्यांच्या मधोमध
वेडावून दाखवल्यागत झुलू लागले...

## भारती बिर्जे

प्रथम :

हे उद्यान उभारले तेव्हाच
काही सौंदर्यशास्त्रीय सिद्धान्त
हिरवळीत रुजवण्यात आले.
दारातून येणाऱ्या प्रत्येकाच्या आरपार पहायला
एक लखलखीत डोळ्यांचा रक्षक नेमला.

उदाहरणार्थ

अ) पहिल्याच दिवशी पाच माणसे रद्द केली.
(त्यांच्या कपड्यांवरचे स्वेदगंध
ते पुष्पगंधांच्या बदल्यात देणार होते.)

ब) दोघांना हाकलण्यात आले.
(त्यांनी चणे खाऊन
कागदबोळ्यांचे कुरूप कोड उठवले
निटस निवडुंगनक्षीवर.)

क) मग तीन बांधीव जोडपी आली
बागेला बहाल करत
सहा हिमशुभ्र स्मिते
आणि त्यांच्याबरोबर
झुळझुळया चाकगाडीतून एक रंगीबेरंगी मूल.
(तेव्हा डेलियाची चार उतावळी फुले
एकदमच उमलली.)
त्या हिरव्यानिळ्या सुखात लगडून
ती जोडपी गेली; कर्बग्रहणाचे तत्त्व आठवत.

नंतर

वाहनांच्या डोळ्यातल्या बंदिस्त विजांमधून
चमकून जाणारे
अल्पसंतुष्ट निसर्गवेड पांघरून
बाग रूपगर्वित.
दरवानाच्या डोळ्यातल्या
तळपत्या तलवारी
गाफिल गंजत होत्या अलिकडेच.

आणि

तो आला. उत्सुक प्रियकरासारखा
(त्याला आत कसे सोडले, कळले नाही.)
त्याच्या डोळ्यात
जुन्या अरण्यांचे आत्मधन्य आभास.
दाट साचलेल्या तिथल्या
हिरव्या अंधारांच्या थरांमधून
काजवे एकदाच चमकले
आणि भकन विझले
मग पेटल्या सूर्यजाणिवा.
तो वळला, निघून गेला
रानझुडपांसारख्या उग्रगंधी
शिव्या थुंकत.

तिथून पुढे

इतर नसते, तर
बाग खचलीच असती.
सध्या रक्षक सजग
डोळे पाजळून.

अपार एकाकी
उध्वस्त तटाकी.

तू. मी.
(ॠणावकाशही यावे कामी.)

वळशांनी काही
सांगायचेच नाही.
माझ्याइतकाच
प्रयत्नात तूही.

या स्पर्शातून
मला कळाले
नुकते पलिकडे
शहर जळाले.
तुला आला का
इथला संदेश ?
रक्तवनांतून
झुलणारी रेष ?
विक्षिप्त क्षणीचा
पुष्पप्रवेश ?

अपार एकाकी
उध्वस्त तटाकी
तू. मी.
चंद्रचकाकी.

शरीर म्हणजे पाचफुटी धडधडते
हृदयच सर्वव्यात अशा क्षणांच्या
काळोख्या बोगद्यांमधून पार झाले अधूनमधून.
न दिसणाऱ्या रंगांचेही रसग्रहण करत
माझे तर सारे भोगलेच मी
आणि कोणत्याही मथळ्यांमधून माझ्याभोवती
प्रसंगांचे सेट्स् उभारले गेले
प्रखर फूटलाइट्स्. अनेकविध मृत्यू.
क्रौर्यशौर्यांच्या पहाडांवर कल्पक लेणी खोदलेली.

येथे हिरवळ वाढवा.
सर्वत्र हिरवळ वाढवा.
मीही सोडून देईन म्हणते कलाबतूचा व्यापार.
विजयस्तंभांसाठी आणलेल्या कच्च्या मालाचे
पक्के रस्ते बनवा खेचरे जाण्यासाठी.
त्यांच्या असमंजस डोळ्यांत मी
मुके पूर्णविराम ठेवीन.

पण हिरवळ वाढवा. सर्वत्र हिरवळ वाढवा.

विकणे आहे—
जिप्सी वास्तू (सध्या स्थानबद्ध.)
दोष एकच :
हिच्या अंगभर उन्हाची पावले स्वयंसिद्ध.

काही सूचना :
भक्क रिकाम्या माणसांनी येथे राहू नये
राहिल्यास बाधेचे रडगाणे गाऊ नये
कोणत्याही भिंतीला शरण जाऊ नये
कोणत्याही भुयारांचा ठाव पाहू नये
गूढतेला खजिन्याची लेबले लावू नये
जुनी चित्रे सापडलीच तर शिल्लक ठेवू नये.

विकणे आहे अशी वास्तु
पायातून भरभक्कम
खिडक्यांशी थोडी हळवी
छताजवळ चक्रम.

सर्वनाशाचे बीज,
ईश्वरी कोपअश्रू,
धारण करणारी भूमी मी.
जळून जाणारी भूमी मी.
मी होते शुद्धश्वेतज्वाळा
जी अखेर रोकड किंमत मोजून
आकाशाकडेच जाण्याचा
देदीप्यमान पराभव मागते.

मी विराटविराण चित्र
पुरे करून
चौकटीबाहेरच रहाते
न्याहाळते थरथरणारी मळकट बोटे.

विरोधाभासांच्या घरावरांवर
माझेच नाव वाचत
या रस्त्यावरून
मी
एकाकी चालले आहे.

प्रत्येक घरातून
वेगळ्या ऋतूंचा उत्सव चाललेला.
येथील झाडांवरही आता माझा
विश्वास नाही.

माझ्या डोळ्यातला
शेवटचा चाणाक्ष ढगही
आता माझ्याशी सहमत नाही.

जिन्याजिन्यातून कौटुंबिक कलंडलेले स्फोट
माझ्या डोळ्यांचे रस्ते होते निर्मनुष्य
निरुपद्रवी उत्सुकतेत झळाळणारे.
खिडकीखिडकीतून माझी तुडुंब प्रतीक्षा
होती विरोधाभासांना सरावणारी
सन्नाट्यानंतरचे माध्यमाचे गोंधळ होते सावरणारे.

आणि गाफिलपणी चहुअंगांनी
कोसळलेले हिंस्रपण
वळणापलिकडच्या चेहऱ्यांमधून, चेहऱ्यांपलिकडच्या
मृत्युतटावरून : जिथे
कच्चीहिरवी सळसळ बिनधास्त टकरावते
रंगरात्रीही. माझा शहारा
त्याच अंधारात वाळक्या गवतामधे
खुरटलेला. फुलांमध्ये गुरफटलेला.

स्मृतींवर गीते, गीतांवर
स्मृती लादणे. शीर्षकहीन दृश्यांची संदर्भचवड साठणे.

या नीलमवेळी
निळा पंथ मज सहज सुचावा
निळया शक्यता
(स्तब्ध/उसळत्या) सहज दिसाव्या.

ही सांजसजणि की
युगे तिष्ठुनी प्रिया कुणाची थकलेली
का पुनः नेमकी
गीतडहाळी सर्वत्रावर झुकलेली...
......
जुळवत आणलेला चेहरा पुनः विस्कटणे.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२८३२
२३१९६
५५५५९
काव्य

दिवस विध्वंसाचाच होता.
आज एकाच वेळी एक मंदिर ढासळताना
आणि एक फूल कोमेजताना पाहिले.
(फुलाचे दुःख मंदिराला वाहून
हौतात्म्याची धनीण झाले.)

आधीच या फुलवेड्या प्रदेशात फुले क्वचितच येतात
आता, फुलांपलिकडच्या रक्ताळ जखमांची
भीतीच येथे विपुल रुजेल.

माझ्या भुरभुरणाऱ्या केसांची अनावर रात्रसखी साद
मी ज्या बोटांनी थोपवली,
तीं बोटे कवितांची होती.

अखेर कुतूहल इतकेच,
कवितांना मी नक्की कशाकशाचे पर्याय करणार आहे!

## वाचा आत्मसिद्ध

अनावर झालेल्या कविता मनातल्या मनात दाबून टाकत असताना
संथपणे पसरलेला माझ्या टेबलॅम्पचा प्रकाश
काळोख होऊन बराच्या शांत फरशीवर झुळझुळू लागलेला
प्रत्येक ओळीत भरलेले काळोखाचे शांत स्तब्ध तुकडे

माझ्या काळोख्या घरात
शेजारच्या घरातला प्रकाश किती सहजगत्या येतो
जसे नुकत्याच वयात आलेल्या मुलीचे डोळे
मनातल्या मनात दाबून टाकलेल्या कवितेत पसरलेले

आता कुणीतरी अलगद तिचे डोळे मिटायला हवेत
कविता कशी दाटून आलीय...

काळं रक्त

मी या खुर्चीत बसतो—न कंटाळता
खुर्चीसारखाच बनतो खुर्चीच्या जगात
सोबतीला फुटकं पेन
त्यातून गळणाऱ्या शाईसारखी या खुर्चीच्या जगात जपलेली तुझी आठवण

मी झाडांची सळसळ ऐकतो; सळसळणारी तू ऐकतो
तू तुझ्या चेहऱ्यावर गोंदून घेतेस
रात्रीत जन्माला आलेली असंख्य शापित काळी फुलं

माझ्या हृदयाचा काळा गुलाब तुला करता आला तर
अवश्य माळ तू तुझ्या केसांत

'त्या दिवशी मी नग्न काळोखाच्या जगात शिरलो तेव्हा ते लोक
सूर्याला अखंड चिरून त्यातून ठिबकणारं काळं रक्त पीत होते.'

मला माहीत आहे
असं काही सांगितलं की तू सळसळतेस

माझ्या दुःखभोर चेहऱ्यावर आज काळ्या कवितेची उदासीन छाया
माझ्या आसवांच्या धारदार टाचण्या लालबुंद हृदयावर टोचून टोचून
निर्मिती करतात काळ्या रक्ताची...

कुणाच्याही नकळत मी काळं रक्त
माझ्या डोळ्यांतून वाहवत असतो...

### *आपलं तसं या आयुष्यात*

आपलं तसं या आयुष्यात कुणीच उरलेलं नाही
असं वाटायला लागतं तेव्हा
दोन मिनिटं सिग्नलची वाट पाहणारी ट्रेन थरथरत रहावी
तसं अंगभर थरथरायला होतं
अर्थात कधीतरी ट्रेनखाली आपले आत्मे चिरडले जातात...झाडं चिरडली जातात.
तू माझ्या आठवणीसाठी लावलेलं लहानसं चाफ्याचं झाड चिरडतं
किती सहज होतं हे सारं

आपलं तसं या आयुष्यात कुणीच उरलेलं नाही
चंद्र असतो आकाशाचा
फुलं असतात झाडाची
रूळ असतात अवाढव्य ट्रेनचे
समुद्रकिनारे असतात एखाद्या फोटोग्राफरसाठी
माझ्या घराच्या अडगळीत
गिटार कितीतरी दिवस धूळ खात बसलंय
तसं आपलं या आयुष्यात कुणीच नसतं
आपल्या शरीरात दाटलेल्या रक्ताशिवाय

### *प्रवास*

कडाक्याच्या थंडीच्या दिवसांत झाडांना सोडून जावं बहरांनी
तसे उदास झालेले तुझे डोळे
आता या थंडीत तू लांबसडक डांबरी रस्त्यावरून
ओव्हरकोट घालून फिरत असशील
कदाचित त्या रस्त्याचं हिरवंगार रानच व्हायचं.

या वेळी थंडीच्या दिवसांत रानांना बहर सोडून गेलेले असतील
जसे निरोप देतानाचे तुझे विझूविझू आलेले डोळे

आता गाडीच्या वेगाबरोबर भराभर मागं जाणारी स्टेशनं
अन् समोर पसरलेल्या रुळांतल्या अमर्याद वाटा...
आता आपला प्रवास सुरू झालाय
कडाक्याच्या थंडीच्या दिवसांत

## मोर

एखाद्या चित्रात मोर नाचत असावा
तसं आकाश
सखी भेटली तेव्हाचं.

आणि नंतर विलक्षण अंधारून आलं
आकाश रिमझिमू लागलं;
स्वतःच्याही नकळत
सखी मोर झाली.

## —— विजया जहागीरदार ——

*मोरणी*

संशयाच्या थारोळ्यात पडलेल्या जखमी मोरणीने
आपल्या पंजांना धार लावत मला विचारलं,
"दगडाच्या थडग्याचं हलाहल पिऊन,
जिवंत झालेल्या...
ज्वालेसारख्या अहिल्येने
पुढे काय केलं, ते मला पटकन सांग!
—गौतमाच्या वाणीवर घण घातले?
की सर्वसाक्षी इंद्राचे अक्ष फोडले?
सांग ग, सांग लौकर!"

तेव्हा...तेव्हा, मी मुकाट्याने,
तिची पिसं पुसून तिला म्हटलं,
"नाचू लाग!"

मला समजावण्या येती, फुका हे व्यर्थ सारे का ?
हसावे मी अशी इथल्या जगाची शर्त आहे का ?

फुले फुलण्याअधी विटली, मने जुळण्याअधी तुटली
अशा अंगार झालेल्या कळ्यांची माळ घालू का ?

थवे फुलपाखरांचे जे हवेसे वाटले होते
अता सुरवंट मेलेले रिकामे कोश राखू का ?

उरी अंधारुनी फुटली, हिऱ्यांची झुंबरे माझी
जिवाच्या झाकुनी जखमा, नमस्कारास येऊ का ?

## बहाणे

कसे जाणिवेचे करू मी बहाणे
मला जीवनाचे हजारो उखाणे

स्वरा कोवळा पूर, दाटे गळ्याशी
कसे वाळते रोज, ओठात गाणे ?

जरी बंड केले, कितीदा मनाशी
लढाईत वरती, तहाची निशाणे

खुळे मौन शापीत आयुष्य सारे
तरी कोरले ओठ हसरे दिवाणे !

उमेदी मनी घेत आकाशझेपा
जिणे मात्र प्रत्यक्ष लाजीरवाणे !

नभी स्वप्न अन् जीवने मातिवरती
कशी दूर होतील व्यस्त प्रमाणे ?

अनुत्तरित माझ्या अशा प्रश्नमाला
न स्वाधीन जगणे, न स्वाधीन मरणे

मी इथे सुकले फुलोनी, पथि कुणी वळलेच नाही
मातीला कळले तशी मी माणसा कळलेच नाही!

गंधही वेडा असा की मैत्रि ना केली दिशांशी
ना स्तुती केली कुणाची—खेळला तृणअंकुरांशी
धूर्त वाऱ्याने तयाला कधि सवे नेलेच नाही!

माणसांच्या चाहुलीची लागलेली आस ऐशी
मी दंवाचा बिंदुबिंदु रोज जपलेला उराशी
शेवटी पाण्यात जळले, तशी कधी जळलेच नाही!

समजले, आयुष्य मजला फसवुनी गेले दुपारी
वंचनेने फाटलेली सांजवेळी मी भिकारी
जन्म-मृत्यू वेगळे का कोरले, कळलेच नाही!
मातीला कळले तशी मी माणसा कळलेच नाही!

*माणसा कळलेच नाही*

अशी सांज का रोज अल्वार होते
उगा हालती काळजातील काटे

मना दूरचे दीप व्याकूळ करती
कढ़ मागचे काहि हृदयात दाटे

ऋतू प्रीतिचा आठवे याच वेळी
सुके वाळले रान डोळ्यात साठे

अशा पारदर्शी क्षणाला निखळती
पुढे ओढलेले सुखाचे मुखोटे

वहीतील सुकल्या फुलांची कहाणी—
इथे नेमकी रोज दृष्टांत देते

## जन्मभर भुलवीत गेले

जन्मभर भुलवीत गेले रूप मायावी सुखांचे
अस्सलाहुन सरस वठले सोंग बेमालूम त्यांचे !

जाणवावी मधुन त्यांची 'गिलिट पिवळी' रंगढोंगे
कत्ल केल्या सर्व शंका, डाग पुसले संशयाचे

चालले मागे कुलंगी, मिटवुनी लाचार तंटे
वाहत्या धमन्यांवरीही रोवलेले हात त्यांचे !

चीड ये खुर्द्यास असल्या तीनपत्ती वागण्याची
कचकडी तक्रार करता लाड केले कुतुहलांचे !

ते म्हणाले त्याप्रमाणे, चालता शुद्धी जळाली
मागुनी वितळून अस्थी पिंड उरले जाणत्यांचे !

पळवले तक्लादु आत्मे याच चाच्यांच्या जथ्यांनी
सोहळे सजवीत गेले, सडत जाणाऱ्या मढ्यांचे !

स्पष्ट कळले शेवटी हे तोतये शाश्वत सुखांचे
ही गिधाडांची सुबत्ता कळप हे तर सामिषांचे !

*तुजसंगती जीवना—*

तुजसंगती जीवना, जमवून घ्यावे किती ?

वस्तीस आले इथे, जे काळजाच्या पथे...
त्यांना कळे ही कथा, इतरांस नाही क्षिती ॥

मी लोचने बांधली, राज्ये तुझी फेडली
तरिही पुराणे गुन्हे, डावात मज गांजिती ॥

युक्ती नसे ना कळा, जो खेळ मी खेळला...
हातात फासे तुझ्या, प्यादी मुकी धावती ॥

तू जे दिले घेतले, ना हिंपुटी जाहले
जयघोष केला तुझा, प्रत्येक घावाप्रती ॥

आणि फुले घेउनी, मी, अपयशाची धनी...
अभिनंदनाला तुझ्या, घोटाळले भोवती ॥

लहरी जरी सोसल्या, जपले तरीही तुला
अंती नसावी घृणा, अपुल्यामधे पेटती ॥

तोडून सारे दुवे, जाईन मृत्यूसवे...
इतके तरी होउ दे, हासून दे पावती ॥

तुजसंगती जीवना, जमवून घ्यावे किती ?

## संवाद

एस्० टी० स्टॅंडजवळच्या
वडासारखा
आपला आयुष्यविस्तार.
अंगभर पोस्टरे
आणि लालभडक फळांवर
कावळ्यांच्या चोची.

बसमधून निघून जाताना
त्याने
आपले तुटके खड्ग
आणि जांभळा अंगरखा
माझ्या दिशेने फेकला.
आता ते खड्ग मी
बागेत फुलझाडांजवळची
माती उकरायला वापरते.
एकदा
काटे,
रात्री स्वप्नात—
जांभळा अंगरखा पांघरून आले;
आणि
सकाळी झाडांना
रक्ताच्या रंगाची फुले.

युद्ध होणार आहे म्हणता?
असेल...ते नेहमीच होणार.
सूर्याचे पाय शाबूत आहेत—
—तोपर्यंत...
निर्वासितांसाठी राहुट्या उभारायला,
आतापासूनच करायची सुरवात म्हणता?
तेही जरूरच आहे.
कालांतराने...
उष्ण लाल रक्त सुद्धा
थंड होत जाणार.
करड़ट काळ दिसायला लागणार.
अहो, नक्षत्रांचेही पंख गळतातच की,
विजांचेही डोळे जळतातच की

प्लीज...जरा एक पत्ता सांगता का?
तलवारींचे नाही हो म्हणत मी.
लेखणीनेच ज्यांना निर्वासित केलंय
त्यांचे कॅम्पस् कुठे आहेत?
प्लीज...जरा लवकर...
उन्हाने...
चेहऱ्याला तडे जायला लागलेयत!

ओढाळ वाऱ्याच्या गर्जना
खेचून आणतात पहाडांकडे
अविनाशी गतीने
असा त्यांच्या चुंबकीय क्षेत्राचा विस्तार

डोळे बांधूनही रानात शिरलो
तरी ओळखू येतात झाडे नि त्यांचे ऋतुबहर,
फांद्यांचा स्पर्श होताच समजतात
त्यांच्या मनातले कल्लोळ...
तरी वाऱ्याच्या ओठातून उमटतो
तो आक्रोश त्यांचा असतच नाही.
प्रत्येकाचे एकेकटे दुःख
त्याच्या पाठीशी गच्च बांधलेले, ढालीसारखे.
...साल अधिकाधिक जून होत जाताना...
कितीही वेगाने धावलो
तरी अंगावर आदळतच रहातात
त्यांच्या आक्रांताच्या लाटा,
वेढून घेतात चोहोबाजूंनी.
प्रतीकाराला शस्त्रे नसलेल्यांसारखी
मी गतानुगतिक
पुन्हा झाडांच्याच आश्रयाला जाते

फेकून देतो, सुसाटवारा
तितक्याच आवेगाने पहाडांपासून.
—अशा त्याच्या चुंबकीय क्षेत्रात
माझ्या अविश्रांत प्रदक्षिणा
जन्मामागून जन्म...
अविनाशी गतीने...

नजरेसमोरून हटता हटत नाही,
तो अंधार असतो
आपल्याच गात्रांतून जन्माला आलेला.
—सहस्रावधी कमळांचे गच्च फुललेले तळे
नि त्यावरून सरकत जाणाऱ्या
अंधाराच्या मेघमाला...

शक्य झाले असते,
तर आपणही पारखून घेतले असते
आपल्या मुळावरल्या मातीचे गुणधर्म.
फूटपट्टीने आखून घेतल्या असत्या
रेषा, तळहातावरच्या.
अन् आपणच उभारत आणलेल्या
या आयुष्याला नावे न ठेवता जगलो असतो.
—दूरवर तळपणाऱ्या दिव्यांच्या माळा
ज्या सतत जागतात मनात
त्या पेटवून भिरकावल्या अंधारावर
चंद्रज्योतींसारख्या
तरी निसटतच जातात
शब्दांच्या मधून मधून अर्थ.

ऐन उमेदीच्या दिवसांत ही स्थिती;
मग माझ्या पाखरांना पंख फुटल्यावर
मी काय गावे?
हे अस्ताला जाण्याआधीच
तू सांगितले असतेस
तर बरे झाले असते...

माझ्या रक्तातल्या
सर्व उकळत्या रसायनांसह
मी ज्यांच्या निर्मितीचा
अतोनात प्रयत्न करीत होते,
त्या वसाहती,
ह्याच धुक्याच्या पडद्याच्या
अलीकडेपलीकडे आहेत.

ह्या माझ्याच अस्थी
माझ्याच रक्तवाहिन्यांच्या जाळ्या,
माझ्याच डोळ्यांच्या
पांढऱ्याशुभ्र कवड्या.
ह्या खुज्या आकृत्या
आणि वसाहतींवर येऊन थडकणारी
अनाहूत वादळेही माझीच.

ही अनाकलनीय लिपी
काळ्या थंडगार दगडांत खोदून खोदून
स्वतःला व्यक्त करताना
स्पर्धेत हरून गेल्यासारखी
हात मागे बांधून
गंभीर चेहऱ्याने
मी चौकटीत येऊन उभी राहिले.

—वाटले होते तितका अंधार
बाहेर पडलाच नव्हता.

## देवता

आमच्या रस्तोरस्ती स्थाईक झालेल्या
पार्थिव देवता
ज्यांच्या एकजात गार बुडाखाली
विंचवांची बिऱ्हाडे

अळ्या–किडे–मुंग्या
किंवा तत्सम बुजबुजाट
वरच्या भक्तांसारखा

रस्त्यावर आलेल्या आमच्या खाजगी भावना वगैरे
थापलेल्या देवतांवर
शेंदूराप्रमाणे
आणि भित्रटांचे नवस फोडलेल्या भकलांतून
गळतात सडक्या पाण्यासारखे

कारण आमच्या खदिरांगार देवता,
ज्यांच्या दैवी कोपाखाली कायम डकवलेला
एक निर्मनुष्य अंधार
कंदिलाच्या तळासारखा.

घट्ट विषाच्या स्फटिकात मी पाहातो कुरतड प्रतिमा
भविष्यकालीन आत्मविध्वंसांची
नियोजित छळाच्या काळ्या जिभांवरून सांडतात
चकाकते थेंब
जसे शब्द जहर पाजलेल्या पात्यांप्रमाणे उतरतात
मनाचे पापुद्रे चिरून
वेदनांना भीक घालण्याची सवती ज्या खुणेपासून
तिचे अन्वयार्थ पेलतोय कबरशुभ्र
स्फटिकाप्रमाणे चकाकत्या आभाळाच्या अनावृत तुकड्याखातर
छत नाही शाकारलं जात आणि सकाळी उठून पहावं तर
पसरलेले असतात घातक बहर
अवचित् अफवेसारखे निर्विकार
प्रतिमा काळवंडत जातात हळूहळू
घट्ट विषाच्या उतरत्या प्रभावानुसार फिकट त्वचेच्या सावल्या
कण्हत उठून बसतात
स्वतःसिद्ध दयेच्या आश्वासनांवर
आता फक्त पुसट डाग नाममात्र परिशिष्टाप्रमाणे.

हिरव्या पात्यांची धार चकाकते...
पार्थिव डोळ्यांवरची अलौकिक कीड
गिळून तिरपी सांजावली किरणं
अलगद चिरफळत जातात कोवळ्या जमिनीवरून;
एकेका शहाऱ्याच्या घनीभूत थरथरत्या शिळांमध्ये
कोरलेल्या अवास्तव मूर्तीसारखा मी
पाहातो कोरलेल्या बुबुळांनी—
काळसर पडत जाणारी तीक्ष्ण धार
आणि हिर्व्या जमिनीवर टपटपणारी कीड
आता घट्ट दातांच्या क्रूर तयारीनं
सबंध अस्तित्वाकडेच वाटचाल करू लागते.

मधुनच रात्री घराभोवती घिरट्या घालणारे चीत्कार
कधी थांबतात. घुटमळतात आणि भुसभुशीत
दाराच्या करकरीचा भुसा
सांडत जातो घराआत
उडतो चौफेर. माझ्या भिंती. माझी अनुवादाची वही.
माझ्या श्रद्धास्थानाची काचबंद अस्तित्वे
गाडली जातात पोखरल्या ढिगाऱ्यात
पहातो ताज्या कबरीप्रमाणे आतून उकरलेली ओली माती
मिसळून गेलेली या हिंस्र दडपणात
आणि बाहेर लोंबणारे स्थानभ्रष्ट डोळेही
रुजवून घेतात अखेरची प्रतिबिंबे

ढिगाऱ्यातून बाहेर आलेला एकच मळका हात माझा आणि
नखं सोललेली निरुपद्रवी बोटे.

घिरट्या

शब्दांवर पाखर

उदाहरणार्थ
उद्या पुनः गुलाम दिशांसाठी एकएक श्वास पसरत जायचं
दररोजच्या विझलेपणासाठी : लोकलज्जेखातर दिवसांवर बसरत जायचं
मधूनच कविता चोळायच्या जखमेवर
आणि काळ्या घोंगडीसारखी दाट दुःखं
अंगभर लपेटून टाळायच्या घोंघावत्या माशा, चटकेबाज उजेड
आणि घड्याळी काटे

म्लान शब्दांवर पाखर घालत जुळवीत न्यायची थेटपर्यंत तुटक वाक्यं
जोवर शक्य.
उद्याचे
आगामी जन्ममृत्यू ठणकत जपायचे अस्तित्वावर
तर आजच्या भविष्यसूचक सूर्यासमोर व्हायचे नतमस्तक
आणि ठोकायचे वाकवाकून
जेरबंद सलाम.

## पौर्णिमेच्या पिठूर प्रदेशात

पार्णिमेच्या पिठूर प्रदेशात
या शहराचं जहर लावलं मी ओठाला.
माझ्याहून ठेंगण्या इमारतींचे मजले
वर माना करून अंधुक हसले.

काळवलेल्या धूसरात
मी कुठेतरी हलत होतो
जमिनीवर माझं झाड उगवल्याप्रमाणे.

माझ्या पानांवर मी
अनेकांची नावं कोरून ठेवली.
विनाचंद्राची अंधुक पौर्णिमा—
मावळताना प्रदेशाला भीती मिळत गेली.

आता मला पाने नाहीत
आणि इमारतींनी झाकून गेलोय.
आता माझ्यात मजले बांधले जाताहेत
आणि मख्खपणे मी
स्वतःचे ओठ चघळतोय्.

सात गाथा

अशा मस्तावलेल्या शरीराने पाण्याला कुठे
निघाली आहेस मुली ?
कालच काळ्याभोर केसांचा एक बुचडा नदीतून
वाहात येताना आम्ही पाहिला आहे.

प्रसूतीच्या वेदनांनी मूर्च्छित झालेल्या मुलीचे आयुष्य
काही घटकांचेच उरल्याचे ज्योतिषी सांगत आहे—
तर ज्योतिषावर विश्वास नसलेला तिचा नवरा
आपल्या पितृत्वावर निहायत खूष आहे.

ऊर धडधडत आहे
पण 'हात ठेवून पहा' असे म्हणण्याचे धाडस
तिच्याने होत नाही.

प्रार्थनेसाठी उच्चारलेला एकूण एक शब्द वाया गेला.
स्वर्ग रानफुलासारखा केव्हाच कोमेजून गेला.

नवतारुण्यासोबत लालसपणा गेला
आणि स्तनांच्या कुप्याही रिकाम्या झाल्या.
तिचे ओठ तेवढे आता अधिक धीट झाले आहेत.
'आमच्यासाठी स्वर्ग ठेवला आहे थडग्याच्या तळाशी !'
ती म्हणते.

पौर्णिमेचा चंद्रप्रकाश आणि आमचे हृदय
ह्यांच्यांत आता काय अंतर उरलेय !
त्यात हिवाळा आहे आणि त्याचे गाणेही.
आणखी काय पाहिजे !

'वृद्धांच्या मनातील तरुणपणाची भावनाच
त्यांची नम्रता अधिक वाढवते' म्हणतोस.
तर मग ह्या म्हाताऱ्या असमाधानी बायकांचे
पिवळया शेल खडकासारखे सुरकुतलेले चेहरे पहा.

आता उजेड असता तर त्याने सभोवतालची शेते पाहिली असती
तरी ओलसर अश्रूंसारखा तो अंधारातून मैदानापर्यंत चालत गेला.
पक्ष्यांचे आर्त स्वर आता ऐकू येत नाहीत
किंवा काही दिसत नाही, काही ऐकू येत नाही, जाणवत नाही.

कुंपणाच्या फाटकाजवळ ती उभी होती
पलीकडच्या शेतांवरून बगळ्यांची रांग उडत गेली
बैलांच्या गळ्यातील घंटांचे आवाजही आता दूरदूर गेले
हां हां! टेकडीच्या माथ्यावर लवकरच उन्हाळा पेट घेईल.

आठवणी मनातून सरकत आहेत
आणि जखमी सैनिकांप्रमाणे नारळाची झाडे तळमळत आहेत.
भरकटत निघालेल्या जहाजांवर
आता समुद्रपक्षी नाही आहेत.

जांभई दिल्यासारखा आवाज काढीत
घोगरा वारा दूर गेला.
चिखल तुडवीत गेलेल्या मुलींची गाणीही दूर गेली.
राजवाड्यावरून एक कावळा उडत गेला.

त्याचा हात तिच्या गळ्यात पडतो
पलीकडे प्रचंड गुहेजवळ फुलाफुलांच्या आठवणी
जागोजाग उभ्या असल्यासारखे त्यांना वाटते
आणि सरोवराच्या पृष्ठभागावर प्रतिबिंबित पहाड थोडा हलतो.

पिवळ्या उन्हाच्या सान्निध्यात त्यांची सुखेच फिकटली.
हरवलेल्या उजेडाच्या अंगणात ते सारे एक झाले
उरलेले!
अरेरे! पलीकडेच स्मशान होते.

आता सूर्य ग्लानी आल्यासारखा दिसला
लाल क्षितिजावर तीन वृक्ष उभे होते
घोगरा वारा नदीच्या पात्रावरून पलीकडच्या शेतात घुसला
तरुण मुलींच्या बडबडीप्रमाणे पाऊस कोसळतच होता.

सायंकाळी क्षितिज भरून येत असे काळोखाने झाकळून
वाट पहायची ती दिवा लावून जेव्हा दिशाही जात मालवून.
पाऊस थांबला आहे, सूर्याने घेतला आहे चेहरा लपवून
अरेरे! त्यांच्या थडग्यातल्या बिळात सावल्या पहात आहेत डोकावून.

कावळ्यांचे थवेच्या थवे घरट्यांच्या ओढीने उडत असतात.
मुलींच्या डोळ्यांतील अबोध तेजाप्रमाणे
गुलमोहोराच्या पानापानांमधून उजेड झिरपू लागतो
काळपट करड्या रंगाची झुडपे एकमेकांकडे सरकू लागतात.

जांभळ्या प्रकाशातील डोंगरांचे कडे त्यांना स्पष्ट दिसतात
आणि ती गंभीर होते.
मागे पसरलेली रम्य हिरवी सपाट राने
टेकडीच्या उतारावरून काही केल्या दिसत नाहीत.

अफूच्या फुलांप्रमाणे हिवाळयाच्या दिवसांना
कुणाचीच पर्वा नव्हती
दुधाच्या दाण्यांनी भरलेल्या कणसांना
भूमीखालच्या चंद्रमुखीची कल्पनाही नव्हती.

आता कोरवडलेल्या दिवसांप्रमाणे शेते नांगरून पडली होती
पेटलेला घोगरा वारा चिंचेच्या फांद्यांमध्ये पावसाचे स्वप्न पहात होता
चीन-जपानमधून आलेले पक्षीही आता कुठे दिसत नव्हते.
माणसांच्या जन्ममरणाला मात्र कुठलाच ऋतू नव्हता.

रानगवताची कण्र्यासारखी जांभळी फुले दवाने गच्च भरतात
गडद निळया छातीची फुलचुखी रुईच्या फुलांतील मध पीत असते
टवटवीत चेहऱ्यांच्या तरुण मुली भरलेल्या शेतांकडे वळू लागतात
जुनी हाडे कुजविण्याची मातीची कामगिरीही चालूच असते.

नशिबालाच वाळवी लागल्याप्रमाणे
जुना निरुपयोगी कुळव बांधावर पडून होता.
घोगरा वारा अज्ञात प्रदेशात निघून गेल्यामुळे
सर्वत्र शांत होते.

फेसाळ दुधासारखे ओढे आता
मंद धूसर दिसू लागतात.
रानशेवंतीचे पिवळसर पांढरेफूल यातनारहित अवस्थेत गेलेले असते.
एकाकी घोगरा वारा सिसमच्या फांद्यांमधून अस्वस्थपणे बाहेर पडतो.

कोवळ्या दुधासारखी गुलछडीची पांढरी फुलेही तिथेच फुलत
आणि मुलींच्या भरदार केसांचा स्पर्श त्यांना मिळत असे.
सुवासिक काळोखातील राजकन्येच्या नसानसांतील
सूर्यफुलांचे स्पंदन तिच्या शयनगृहातील घुबडांना आता माहीत असो-नसो.

त्या गढूळ पाण्याने काय काय वाहून आणले हे सांगता येत नव्हते.
तरी त्यात मातीच्या स्वभावाचे कित्येक नमुने असण्याची शक्यता होती.
पाठीच्या पन्हळीसारख्या छोट्या घळींतला मऊ गोरा चिखल
मात्र रानाला शोभून दिसत होता.

फार प्रचंड खोल खडकांत उत्खननाची वाट पहात राहिलेल्या
महाकवीप्रमाणे त्या गांडुळांचेही एक स्वतंत्र जग होते.
ते मात्र कुणाचीच वाट पहात नव्हते आणि कर्दळीच्या
बीसारखी काळी कोमल रात्र पडली तरी आपले काम थांबवीत नव्हते.

संधिप्रकाशातील सरोवराप्रमाणे
विनाशाच्या सावल्यांनी त्यांचा स्वर भरून येतो
आणि मानवजातीवर पसरत चाललेल्या
चिरंतन काळोखावर ती हंबरते.

बेफिकीर हिवाळ्याचा ऐहिक ताठरपणा अजून संपलेला नव्हता.
का कोण जाणे, शून्यात नजर लावून दिवस आपले जातच होते.
मी पाण्याने भिजले आहे आणि खूप गारठले आहे
—भूमीखालची चंद्रमुखी आता स्वप्नांतून सांगत होती.

लिलीचे घर, डोंगर, झाडे यांच्यापलीकडे जांभळा प्रकाश पसरू लागतो
शेवरीच्या पिवळ्या फुलांचे झुबके यत्किंचितही हलत नाहीत
संकटाचा अनुभव नसलेली तिची पाने वर्षाऋतूवर रुसून बसतात
शाकारलेल्या छपरावर बसलेल्या रॉबिन पक्ष्याला एवढी शांतता पुरी असते.

आंबराईच्या पलीकडे ती उसाची शेते आता नाहीत.
कळकीच्या झाडांप्रमाणे असलेले त्यांचे मालकही आता नाहीत.
कोण जाणे, पुरातन काळात पऱ्यांची राज्ये असतीलही
कारण विनाशाच्या नियमानुसार आपली हृदये अस्तित्वाने भरून असतात.

रानाचा आत्मा जागृत होऊन आळशीच्या पिकावर निळा निळा फुलतो
पानांच्या झुबक्यांमध्ये दडलेल्या घरट्यांतून बाहेर येण्यासाठी पक्ष्यांची पिले धडपडू लागतात.
माळावरील पांढऱ्या देवळाची पाऊलवाट रानगवताने पूर्ण आच्छादून टाकलेली असते.
बाभळीच्या फुलांप्रमाणे सुखदकालाचा आस्वाद घेणाऱ्या नवविवाहित मुली मोठ्या मजेत गुणगुणत असतात.

पर्युत्सुक ग्रामकन्यांप्रमाणे रानातील बोरींची झाडे निश्चल दरवळली होती.
उतार असलेल्या घराच्या छपरावर एरंडीच्या बीतून लाल आकड्यासारखा अंकुर बाहेर येत होता.
आता बाभळीच्या झाडांत घोगरा वारा काट्यांनी विंचरला जात होता
आणि पुष्कळ अडचणींना तोंड दिलेले त्याचे वडील आवाजरहित पक्ष्याप्रमाणे वेळ घालवीत होते.

सुदूर सरोवराचा आर्द्रधूसर नीलिमा हृदयात भरून घेऊ दे.
थांब रे थांब ! भरलेल्या शेतांचे सुखद सुगंधी श्वास अजून कवटाळून झाले नाहीत.
अथवा हे अतिथी ! डोंगर-झाडांनी सजलेलं हे यजमानहीन विश्रांतिस्थल
वाटल्यास खुशाल खुशाल नाकारून तू जा !

## रंजना विगम

### ओल

वेड पांघरुनी झाडं
उभी रांगेमधी दाट
मागे टाकुनी आखर
मन सुटले मोकाट.
मासे पकडाया जळी
कुणी टाकलेला गळ
खोड काढता पानांची
खोल रुते सळसळ.
ओल फुटे पदरात
हात पोटाशी धरता
गंध मातीचा जाणवे
रान हिरवे जपता
कुठे नाही कुजबूज
पाय असा घसरला
गाळ पसरण्याआधी
जसा पूर ओसरला.

### राखण

रात रात जागलीची
दूर पाखरांचे थवे
पीक राखताना उभे
कुणी सोबतीला हवे.
रोप रोप दुधाळले
वर चांदण्याची कोर
पीक बघता बघता
जीवा लागतसे घोर.
कोर ढगात बुडाली
मग भ्याले गारव्यात
डोकं टेकता उशास
झोप सलली डोळ्यात.

रानच्या वाटेनं
जमीन पड्यार
रुसून कवाची
मिरुगाची सर

आमराईखाली
गाईचा गोहन
भोवताल सारी
इसल्याची उनं

थंड्या सावलीत
मन इच्यारात
जवळच आला
पेरावाचा घात

ढगाची अमदा
चुकली का वारी ?
घरात धानाची
रिकामी बखारी

वझाड वझाड
भोवती आभाळ
वझाडला आता
मनाचाबी तळ

मृत्यूच्या वेगाने तुझ्या हृदयाकडे येणारी बंदुकीची गोळी
मला थोपवून धरता आली नाही.
मला एवढेच करता आले :
तुझ्या झपाट्याने अचेतन होत जाणाऱ्या देहात
नग्न होऊन फुलांएवढे प्राण भरता आले
तेव्हा उजाड झालेल्या रानातही,
आटलेल्या झऱ्याचे गौरवगान सुरू झाले
कृतज्ञतेने भरून आलेल्या डोळ्यांतून पाण्याचे थेंब
संथपणे ओघळत होते
माझे हात तुझ्या हातात होते.
ते परके होते !

गतस्मृतींनी व्याकूळ झालेले तुझे डोळे
माझ्या पदराने झाकून घेतलेस तू.
अशी असंख्य स्मृतिचित्रे माझ्या हातात ठेवून
तू पुन्हा विन्मुख,
घाटातील दूर गेलेल्या विषण्ण दरीसारखा

इतक्या लांबूनही तुझा हात माझ्या हाती
असल्यासारखा,
हा स्वच्छ उबदार परिसर
तुझ्या पाठीशी स्तनांचा भार झोकून
मी निर्भर
स्वतःशी गिरकी घेणाऱ्या रानपाखरासारखी

क्षणभर अधांतरी थांबून पक्ष्याने सावजावर
झेप घेतली—
तेव्हा तुझ्या सृजनव्याकुळ मिठीत देखील
माझी नजर थरथरली

मी पाहात होते आडरानी स्वच्छंद झरा
तशी अवखळ निसटून गेलेली खार
अन् काट्यांत अडकलेले माझे पाय
तू अलगद सोडवून घेतले होतेस.

### *पहिल्या थेंबांचे आकाश*

जमिनीला डोळे फुटावे
असे ह्या ढगांचे पुण्य
माझे आयुष्य इथूनच फळाला आले.

सर्व व्यापून काळोख उरला म्हणजे किती बरे वाटते
माडांच्या दाटीतून पाऊस अंगभर धावत यावा
जसे बेवारशी पाखरांचे थवे...
घरभरून ओसंडावे असले अप्रूप सोहळे
इतके दिवस आपणच दुःखी होतो
बरे झाले
आता सारेच दुःखी झाले

पहिल्या थेंबांचे आकाश अंगावर झेलताना
शहारून यावेत ह्या रंध्रांचे गाव
अशा वेळी कधीही न घडलेल्या भेटीवर
बोटे ठेवत
कोणीतरी शोधत असेल आपल्या साथीदाराचे नाव
जसा मी
तुझ्या गावात शिरू पहाणारा

पाऊस आक्रंदून कोसळताना घरबसल्या
असेच सुटतात हे घोडे बेताल
अशा ह्या प्रलयकाळी मी तरी आणखी काय करू?
घट्ट मिटून हे कवितांचे श्वास
काळजावर फुले कशी ठेवू?
त्यात अहोरात्र सर्वव्यापून काळोखभरला पाऊस
कोसळतोय आत
कोसळतोय बाहेर...

यक्षभूमीच्या पवित्र खोऱ्यातून
नदी वहातेय संथ
अहिल्येसारखी नदीच्या तळात गल्बते बसलेली
कधीही न येणाऱ्या रामचंद्राची वाट पहात

नदी

एक होडी तरंगतेय स्वतःतच दंगून
होडीत गुलाबांची स्वप्नेच स्वप्ने...

पुढे नदी एक नाजूक वळण घेते
होडी हलतच रहाते...
गुलाबांची स्वप्ने हिंदकळतात

गावामागून गावे
झाडांमागून झाडे, वेळूची बेटे...
नंतर नदीला तीन फाटे किंवा अनेक
होडी बिचारी एकटी!
होडीला प्रश्नच प्रश्न :
आता ह्या स्वप्नांचे काय करायचे?

न सुटणाऱ्या प्रश्नांची उत्तरे
नदीत सापडतात म्हणे!
शेवटी नदी होडीत आली
की होडी नदीत गेली हे कळणे कठिण गेले

प्रदीर्घ काळाच्या यात्रेला निघण्याचे निमित्त करून
मी नुस्त्याच नावा सोडत बसलो.

समुद्र

ह्या समुद्राला किनाराच नव्हता...

युद्ध पुकारल्यागत समुद्रभर गच्च भरून राहिलेली
ही जहाजे कुणाची आहेत?
फाटलेल्या शिडासारखे दोन्ही हात उंचावून
मी हाका घातल्या आभाळाला
तर उरलासुरला नांगरही तुटून पडला

सगळयांच्याच डोळयांतील समुद्र आटून गेलेयुत
उगाच आपण होड्या बदलत राहिलो
प्रत्येक होडीचा तळ तर फुटलेलाच असायचा

हृदयरुदनाची ही गाज ऐकू येतेय ना!
मग समुद्र दुभंगून एखादा किनारा
नक्कीच इकडे सरकत असेल...

मैफल

आत्ताच तर मैफल रंगवून ते गेले होते
त्यांची गाणी कोण्या चेटकिणीने
अशी उधळून दिली!

प्रेतांवर फुलांचे एवढे ढग रचणे
बरे नव्हे वेड्यांनो
अरे, फुलांच्या ओझ्याने तो मरून गेला तर!

म्हणून जगणाऱ्यांनीही आपापल्या दारात
प्राजक्ताची हजारो झाडे लावावीत
म्हणजे लाखो फुलांच्या मृत्यूचे सोहळे
आपल्याला दररोज
साजरे करता येतील...

चेहरे

वादळ होऊन माझ्या कुशीत ये
नुक्ताच बहरलाय हा वृक्ष सर्वांगाने
दूरच्या रानातील पंखझड
तुला ऐकू येत नाही का ?

सगळे हरवलेले चेहरे
सर्वत्र लुटलेली घरे
मी कुठाय ?
तू कुठाय ?
नाही नाही, आता येता येणार नाही रे माधवा
ह्या वृक्षाला मी मुळापासून जखडला गेलोय

दरवर्षीच्या पावसासारखा आता मी
गेल्या वर्षीचा वसंत मला आठवत नाही
सापासारखी बदलते आहे माझी कात
आता मला भिकाऱ्याचे डोळेसुद्धा
हिऱ्यासारखे दिसतात...

## आनंद कुमठा

*माझ्या खोलीतल्या भिंतीभिंतींना चिकटवलेली माझी पेंटिंग्स*

तुझ्या इवल्याशा मांड्यांवर पाटी ठेवून
तू रेखाटत होतीस.
सगळे तपशील भरून झाल्यावर रंगही भरू लागलीस
उत्साहानं.
शेवटचा रंगही तुझ्या मनाजोगता भरून झाल्यावर
क्षणभरही डोळे भरून न बघता लगेचच
अगदी सहजतेने पाटी झर्रकन पुसलीस
अन मजेत खेळायलाही पळालीस.

—तुझा अस्सा हेवा वाटलाय!

*समांतर*

...तेव्हाचे आपले आदर्श, स्वप्नं...
अन् आताचा तू.
तू न सांगताही
तुझ्यातल्या ह्या बदलाचा उतरता आलेख
समजतोय मला.
तरीही तू तुझी जुनीच प्रतिमा टिकवू पाहतोय्स
माझ्या मनात.
मी समजू शकतो, तुला वाटणारी लाज.
मी खरंच तुला माझ्याइतकाच पूर्णपणे समजू शकतोय.

...आपण आपल्या प्रतिमा वगैरे मोडून टाकून
आपल्या नात्याची नव्याने सुरुवात करायची का?
—पण धीरच होत नाही, हे तुला सांगायचाही.

सध्या तरी
तूही तुझी जुनीच प्रतिमा टिकवू पाहतोय्स
माझ्यासारखाच.

थबकून थोडंसं विचार करायला लागल्यावर
एकेक गोष्टी समोर यायला लागतात...
माझा बाह्य झगमगाट व
आतल्या तोकड्या मिती.
स्वतःबद्दलचा अतीव अहंकार आणि
इतरांबद्दलची आत्मकेंद्रित उदासीनता.
घडविणाऱ्यांना श्रेय द्यायला नकार अन
माझी नाती फुलवण्याची अ-क्षमता.
आणि हे सर्व पूर्णपणे मान्य करून
भरभरून देणारी तू.

मग मी क्षुद्र इवलासा होऊन
तुझ्या अपार मायेच्या कुशीत
अलगद डोकं ठेवतो.

## साक्षात्कार

तू पूर्णपणे ओळखतेस मला.
माझ्या आयुष्यातल्या सर्व लहानमोठ्या घडामोडी
मी पहिल्याप्रथम तुलाच सांगत असे उत्साहाने.
माझ्या कविताही पहिल्याप्रथम तुलाच ऐकवायचो मी.
तूही टपोऱ्या डोळ्यांनी एकटक माझ्याकडे पहात
सर्व काही शांतपणे ऐकायचीस पूर्ण कळल्यासारखं.
मग तू स्वतःला विसरून जाऊन मीच बनायचीस.
अन् माझी स्पंदनं अनुभवायचीस,
साठवायचीस.
माझ्या सृजनशीलतेच्या ह्या चढत्या प्रवासाचीही
तूच साक्षी होतीस.

पण आज मी कविता ऐकवताना
तू खिडकीबाहेर बघत हळूच जांभई दिलीस
अन् पहिल्यांदाच तुझ्याकडे मी नीट पाहिलं.

तुला संपूर्णपणे गृहीतच धरत आलो होतो मी !

एखाद्या कुंद संध्याकाळी आपण एकटेच असतो.
मग आपण पाठची खिडकी उघडून बसतो.
आधी दिसतात ढग, उदास...
भयंकर पाऊस तर पडून गेलेलाच असतो त्यांच्याकडून
म्हणून तेही असतात गपचूप : अपराध्यासारखे...
चिखल फार उडाल्याने समोरचे चर्चही
खवळलेले असते प्रचंड.
..आणि इतर सगळीकडे चिडीचूप शांतता असते
नुकताच भयानक पाऊस पडून गेल्यावरची....
आपल्याला असह्य होऊन आपण खिडकी लगेच बंद करतो.
गच्च.
पण संध्याकाळ तरीही कुंदच असते.
आणि आपण एकटेच.

## संवाद

परतताना एकटेच जळणार आपण; तर
मनातल्या स्वच्छ तळ्याविषयी कळू देऊ नये
कुणालाही.
तिथेही पोहोचतील नाहीतर त्यांचे उच्छ्वास
कुबट काळोखी.

किती गर्दी असते आसपास !
आपलं संपूर्ण आयुष्य वापरलं जात असतं
गर्दीकडून;
आणि मग आपण निष्फळ वाटतो आतआत.

—तर अधूनमधून काठावर बसायचं एकटंच
सावलीसुद्धा झुगारून.
मृत्यूएवढं नागवं व्हायचं.
कोपऱ्यात पडून असलेल्या शब्दांवरची बुरशी
झटकून
भावड्या कोवळ्या मुलीसारख्या ओळींतून
संवादत राहायचं स्वतःशी.

एकसुरी गाण्यासारखं कंटाळवाणं आभाळ निस्सीम
आणि साऱ्या दिशांना नसलेपणाचाच चिवट्ट पीळ
वाटातल्या धोकादायक वळणांसारखा.

*शीळ*

पापण्यांना लटकणाऱ्या थेंबासारखी फडफड करीत
एकाकी भिरभिरणाऱ्या पक्ष्यासारखं
माझं हृदय.

वाटतंय
बोटात सुई टोचून अचानक
थेंब फुलावा लालबुंद
तशी धारदार शीळ बाहेर पडावी पक्ष्याची
दिशांचा पीळ सहज सोडवणारी.

*रात्र*

कोसळण्यास उत्सुकलेली आंधळी रात्र
आणि तिचे दाटून आलेले आभाळ
दुखावून मुके मुके झालेले.

हळू हातांनी विझवलेल्या दीपांचे धूरपक्षी उदास उदास
अंधाराच्या खडकावर आदळून फुटणारे.

हुंदक्यांच्या वावटळीत गुदमरलेली रातराणी
मुद्दाम खिडकीशी ठेवलेली;
आणि प्रत्येक फुलाच्या कंठापर्यंत
वाबळलेले खारट पाणी—

## डोळ्यांत जास्वंदफूल पसरते

डोळ्यांत जास्वंदफूल पसरते
आणि डोळे होतात
माळावरील आकाशाची ओसाड संध्याकाळ
जिथे प्रत्येक निमिषाचा जास्वंदी निरोप
समुद्रभरती देत असतो डोळ्यांना
मला आहे माहीत
दूर असलेले क्षितिज जेव्हा पापण्यांजवळ येऊन ठेपते
तेव्हा हे सारेच असते अटळ.
जास्वंदाला रंग असतो फक्त रक्ताचा
उद्‌ध्वस्तता दाखविणाऱ्या ह्या फुलाच्या आकारातही
स्पष्ट असतात रक्ताच्या सीमा.
किनारा ओलांडून ते निर्गंध रक्त पसरते
माझ्या डोळाभरून
मीच माझ्या डोळ्यांचा घेतो निरोप
हे सारंच असह्य होऊन.

*आकाश पहावे*

मीच फक्त अनवाणी, माझ्याच तळपायांना चटके,
माझीच फक्त ओंजळ रिकामी :
असे गाणाऱ्याने
आकाश पाहावे.

माथ्यावरील आकाश धुऊन काढते मीपण आणि माझेपण.
दुष्काळ पडतो कुणाच्या अंगणात,
कुणाच्या वाटेवरील हिरव्या वृक्षांचे पिसारे झडून जातात,
कुणाच्या शेताचे अकालीच माळरान होते.
निर्मनुष्य होते वाट, सहस्र योजनांपार लपते हटवादी पहाट.
मातीत बुडतात कित्येक कळ्या; रडतात एकट्या एकट्या
कोवळ्या डहाळ्या.
कधी कुठेच काही नसते, कुणाची नजर
क्षणाक्षणास रक्तफुलांना जन्म देते.
आपले नंगे पाय दाखवून, दिशांच्या टोकांपर्यंत आक्रोश पसरवीत
आपणच फक्त रडावे काय?
गाव नक्कीच गोळा होईल समुद्रासारखा घेऊन डोळ्यांखाली
अश्रू सुकून राहिलेले मीठ.
सदैव भरलेले घडेसुद्धा उपडे होतील.

कारण प्रत्येकाच्या माथ्यावरील आकाश वेगवेगळे नसते
संपूर्ण आकाशगोलाखाली अनंत पावले ऋतूंना पार करीत असतात.

### तो कंदील

तो कंदील तसाच राहू दे मिणमिणता
फुलपिसाऱ्यांजवळ,
जरी अंधारले नसले माझे घर.
मी विणले माझे कष्ट नशिबाला झुगारून
उकलण्यासाठी मिटलेल्या पाकळ्या; जेव्हा
रात्री होत्या डोळ्यांत–गळ्यात आवंढे अंधाराचे
आणि अंगणात तडा गेलेली बाग;
तेव्हापासूनच कंदील मिणमिणतोय !
राहू दे तसाच.
कुणी सांगावे ह्या फुलपिसाऱ्यांचे आयुष्य ?
कुणी सांगावे,
फुलबागेची स्मशानयात्रा केव्हा निघेल ?
अजून खूप रात्री येणार आहेत
तो कंदील तसाच राहू दे मिणमिणता...

शांतता पसरते सर्वत्र
आठवणीतल्या ओल्या बागेसारखी.

## संवाद

अधुऱ्या कहाणीच्या मुक्या दुःखासारख
ह्या शांततेचा अंत
वाट पाहात असतो कदाचित
कुणा प्रिय व्यक्तीच्या अवघ्या अवधानापाशी

आपल्या एखाद्याच उत्कट शब्दाची.

बागेतील पिवळ्या गवतावरून
वारे वाहात राहावेत नुस्तेच
तसे काही संवाद शांततेशी

हवे तर आपलेच आपल्याशी.

मनःपूर्वक बेफाम होऊन
झाडं सळसळतात,
आणि गप्प होतात
थंडीतल्या तुडुंब तळ्यासारखी
तेव्हा ओंजळीत टपटपतात
फुलं खूपशी;
कधी सारंच अनावर
झाडंच कोसळतात अंगावर
इतकी की
पुन्हा उठून फुलं हुंगण्यासाठी
राहात नाहीत मोकळे श्वास
ओंजळभरही.

## झाड

आता ह्या एकाएकी उन्मळून पडलेल्या
झाडाचं
काय करायचं ?

आधी झाडावर असलेली काही फुलं
परडीत गोळा करून
देवघरात ठेवून द्यावीत.

पानांचे हिरवेगार शब्द
बाजूच्या मातीत खोलवर पुरून ठेवावेत
आणि खुणेसाठी
वर एखादा दगड ठेवून द्यावा.

आता उरलंय ते खोड आणि
फांद्या.

खोडाचा एखादा झोपाळा करून घ्यावा,
आपल्या बागेत बरा वाटेल;

आणि फांद्यांचे जाड जाड रूळ
स्वतःच्याच तळहातावर
सटासट ओढण्यासाठी...

## मुक्ती

मैफलीसाठी दिवा पेटवून कुणी देवदूत
निघून गेलाय;
अशा मैफलीत स्मृतिभ्रंशाने
गाण्याचा अर्धा पेला कलंडून
मी उद्ध्वस्त.

आणि येणारी रात्र निस्संदर्भ आहे
देवदूताच्या अजूनही मिणमिणणाऱ्या
दिव्यासाठी.

आता वाहणारा वारा विखारी
पोहचवील का माझी एकाकी जाग
वाळूच्या समुद्रासारखी,
देवदूताच्या क्षमाशील पावलांपाशी.

तसे अखेर आहेच अशा शापग्रस्त
प्रवाशासाठी
आपणच आपले उंट होऊन पार करणे
वाळूचा समुद्र
अर्ध्या गाण्याच्या मुक्तीसाठी.

# काव्यक्षेत्रातील नव्या दशकाचा आरंभबिंदू

गेल्या वर्षी 'कविता दशकाची' हा संग्रह प्रसिद्ध झाला. १९७० ते ८० या दशकात ज्यांनी आपल्या काव्यलेखनाला सुरुवात केली, आपल्या कवितेचा स्वतंत्र चेहरा सिद्ध केला, आणि चालू दशकावरही आपला प्रभाव राहणार आहे याची पूर्वसूचना दिली, अशा दहा तरुण कवींचा तो संग्रह आहे. आम्ही पाच संपादकांनी संग्रहातील कवींची व कवितांची निवड केली. त्या वेळी दहा या संख्येचे बंधन आपण उगाच घालून घेतले की काय, असे वाटले. ते नसते तर आणखी दोनतीन कवींचा सहज समावेश करता आला असता. त्या कवींच्या दहा चांगल्या कविता सहजपणे निवडता आल्या असत्या असे नव्हे. जरा खटपट करावी लागली असती. पण चांगली कविता सातत्याने लिहीत राहण्याचे सामर्थ्य त्यांच्या प्रतिभेत आहे याचे प्रत्यंतर त्यांच्या काहीशा कच्च्या लेखनातूनही येत होते. म्हणूनच त्यांना वगळावे लागले याची खंत वाटली. आणखी एक खंत होती : चांगल्या कवींप्रमाणेच, काही चांगल्या कविता वगळाव्या लागल्या याची. ते क्रमप्राप्तच होते. कारण एखादी चांगली कविता लिहिणारा तो कवी एरवी फार सामान्य लिहितो आहे असे जाणवत होते; ती कविता हा एक दैवयोगच होता की काय, अशी शंका येत होती. अशा योगांची, अपघातांची दखल कशी घेणार? दोनतीन कवी चांगले लिहितील असे आतून वाटत असले, तरी भविष्यकाळात तसे घडेलच असे तरी ठामपणे कसे सांगणार?—त्यापेक्षा घालून घेतलेल्या बंधनात राहणे श्रेयस्कर असे वाटले.

तरीही रुखरुख राहिलीच. त्यातून एक थोडासा तात्त्विक प्रश्नही उपस्थित झाला. तो असा की असे अल्प किंवा अल्पकाळ चांगले लिहिणारे जे कवी असतात त्यांचे काय करायचे? वैपुल्य व सातत्य हे निकष लावून त्यांच्याकडे अजिबात दुर्लक्ष करायचे? हे गैर वाटते. कारण या दोन गोष्टींना तसे काय महत्त्व असते? अखेर त्या दीर्घकाळ केलेल्या, विपुल लेखनातील चांगले किती हेच आपण पाहतो. ते थोडेसेच असले, अपघातासारखे असले, त्यानंतर काही नसले, तरी ते कोठेतरी नोंदले जायला नको? केवळ कर्तव्य म्हणून नव्हे; ज्या कालखंडात ते लिहिले गेलेले असते, त्या कालखंडाचे सर्वसाधारण चित्र रेखाटणे त्याखेरीज अशक्य असते म्हणून. चांगले, वाईट—सगळेच विचारात घेतले पाहिजे. ते स्वतंत्र नसते; स्वतंत्र भासले तरी त्यामागे त्या कालखंडाच्या विशिष्ट प्रवृत्ती असतात. या प्रवृत्तींचा मागोवा घेण्यासाठी जेवढी म्हणून साधने उपलब्ध करणे शक्य आहे तेवढी केली पाहिजेत. पुस्तके असतातच. पुस्तकांतून न सापडणारे बरेच काही नियतकालिकांतून सापडते. पण नियतकालिकांपर्यंत पोचणेही काहींच्या नशिबी नसते. त्यांना गेल्या काही वर्षांत अनियतकालिकांचे

पार बुजलेली नसावीत. त्यांच्यातून उद्भवलेले एखादे स्पंदन जाणवले तर आज काय घ्यायचे यासंबंधी एक वेगळी जाण, दृष्टी येईल. त्या घेण्यात अगतिकतेचा, क्रमप्राप्तीचा भाग कमी असेल. या भूमिकेमुळे 'कविता' वाचल्यानंतर माझ्या मनात प्रथम आलेला विचार हा की नव्या वाटांनी पुढे जात असतानाच कधीतरी मागे जाऊन थेट जुन्या कवींना भिडणारा, त्यांचे चलनवलन सुरू करणारा एखादा कवीही आता निर्माण झाला पाहिजे. 'कविता' या संग्रहात त्याची उणीव जाणवते.

पण ही उणीव असली तरी या संग्रहात जी कविता वाचायला मिळते तीही महत्त्वाची आहे, काही नव्या जाणिवा देणारी आहे. या जाणिवांची ओळख करून घेण्यापूर्वी ही कविता लिहिणाऱ्या कवींची आतापर्यंतची वाटचाल कशी झाली आहे हे पाहिले पाहिजे. एकदोन अपवाद वगळता बहुतेकांची सुरुवात गेल्या सातआठ वर्षांतील असावी. त्यातील आधीची दोनतीन वर्षे त्यांचे नाव एका विशिष्ट वर्तुळातच परिचित असणार; कॉलेजचे भित्तिपत्रक किंवा नियतकालिक यांतच चमकले असणार. पण या थोड्या खाजगी प्रसिद्धीची उमेद वाढायला मदत होत असते. त्या उमेदीतूनच त्यांना एखाद्या वाङ्मयीन नियतकालिकाकडे आपले लेखन पाठवावेसे वाटले असणार. तेथे नेहमीच स्वागत झाले असेल असे नाही. पण ती निराशा कमी करायला एकदोन अनियतकालिके होती; 'महाराष्ट्र टाइम्स'ने नवोदित कवींसाठी आखलेल्या काही योजनाही होत्या. त्यामुळे या अवस्थेत वाटणारी प्रसिद्धीची मानसिक गरज पूर्ण होत राहिली, लेखनही चालू राहिले. आता आणखी काही नव्या योजना आल्या आहेत. उदाहरणार्थ, ही संकलने प्रसिद्ध करण्याची योजना, किंवा नवलेखकांच्या पहिल्या संग्रहांना अनुदान देण्याची साहित्य संस्कृति मंडळाची योजना. त्यामुळे अलिकडे मराठी वाङ्मय मंडळ ते साहित्य संस्कृति मंडळ हा प्रवास पुष्कळच वेगात होतो! हा वेग विकासाला हितकारक आहे काय? याचा अर्थ कवीने वर्षानुवर्षे प्रसिद्धीची वाट पाहात झुरावे असा नाही. पण ती प्रसिद्धी सुलभपणे मिळू लागली की आत्मविश्लेषणाला लागणारा वेळ कमी होतो. याचे काही तोटे असतात. एक तोटा असा की एका ठिकाणी चमकदार वाटणारी कविता दुसऱ्या ठिकाणी तशी का वाटत नाही, हा विचारच मनातून निघून जातो. भित्तिपत्रकाचे क्षेत्र वेगळे; आणि एखाद्या वाङ्मयीन नियतकालिकाचे क्षेत्र वेगळे. दोन्ही ठिकाणची संगतसोबतही वेगळी. वेगवेगळ्या सोबत्यांत उठून दिसले पाहिजे. त्यासाठी एक वेगळे व्यक्तिमत्त्व असले पाहिजे. पण ते आहे की नाही हे शोधण्यासाठी, ते घडविण्यासाठी सवड कुठे उरलेली असते? वेगात लेखन होत असते; काय फेकले पाहिजे आणि काय बाळगले पाहिजे याचा विचार होत नाही. त्यामुळे जे अनावश्यक आहे ते तसेच रेंगाळत राहते आणि शेवटी मुरतेही! या वेगात, दोन प्रतिमांची परस्परांशी स्पर्धा चालू असते. एक कवीची, जिच्यावर कोणतेही नियंत्रण नाही अशी, प्रतिमा; आणि दुसरी कवी, काही वृत्तींच्या आहारी जाऊन, तयार करत असलेली प्रतिमा. दोन्ही अनाकर्षक. त्यांचा संयोग करणे, त्यांच्या-

प्रवेशद्वार खुले झाले आहे. या साधनांप्रमाणेच, भविष्यकाळाचा विचार न करता, वर्तमानकाळात लक्षणीय वाटणाऱ्या लेखनाचे संकलन हेही एक साधन आहे. 'कविता दशकाची' या संकलनात भविष्याचा विचार होता; 'कविता' या संकलनात तो नाही. दोन्ही संकलने साधने म्हणून महत्त्वाची; आणि एकमेकांना, संपादकीय धोरणात फरक असला तरी, पूरकही. दोहोंचे एकत्र वाचन करणाऱ्या वाचकाला, गेल्या काही वर्षांत मराठी कवितेच्या क्षेत्रात काय घडले आणि काय घडत आहे याची संपूर्ण कल्पना येईल. काय घडणार आहे हे कोणी सांगावे? त्यासंबंधीचे अंदाज काही वेळा राशिभविष्याइतकेही खरे येत नाहीत! तेव्हा वर्तमानकाळावर लक्ष केंद्रित करावे आणि पुढे तो ज्यांचा भूतकाळ ठरणार आहे अशांना सामग्री पुरवीत राहावे हा उत्तम मार्ग!

'कविता दशकाची' आणि 'कविता' यांच्यामधील नात्यासंबंधी आणखी थोडे. 'कविता दशकाची' हे 'कविता'चे मोठे भावंड आहे असे मानायला हरकत नाही. 'कविता दशकाची'मध्ये, सध्या काव्यक्षेत्रात स्थिर होऊ पाहत असलेल्या पिढीचा सूर सापडतो. त्या सुराचा स्पर्श झालेल्या वातावरणातच 'कविता'मधील कवी वाढत आहेत. अनुकरण नाही; पण संबंध जाणवतो. तो संबंध तोडून टाकण्याचा प्रयत्न नाही हेही विशेष वाटते. एक तर, इतक्या लगतचे काही सहजासहजी तोडता येत नाही. पण त्याहून महत्त्वाचे कारण हे की, ही ताजी, समकालीन कविता 'कविता'-मधील कवींनी 'आपली' मानली आहे. तेच त्यांचे संचित आहे. आधीची कविता या थरातून झिरपून त्यांच्यापर्यंत आली आहे. त्यामुळे ही कविता वाचताना रेगे-मर्ढेकरांची आठवण होणार नाही, तर रेगे-मर्ढेकरांनी संस्कारित केलेल्या आजच्या कवितेची आठवण होईल. याचा अर्थ असा की रेगे-मर्ढेकरांसारखे जुने कवी आता परंपरेत गोठू लागले आहेत. त्यांचे देणे संपत आले. ते घेत घेत कविता पुढे सरकली. या प्रवासात देणारी केंद्रे बदलली. हे प्रत्येक पिढीत होत असते. पण या पिढीत ते विशेष उठावदारपणे झाले. हे कितपत योग्य झाले असा प्रश्न मनात येतोच. एका पिढीतील कवींनी वेगवेगळ्या पातळ्यांवर एकमेकांना प्रतिसाद देणे आवश्यक आहे, हे खरेच. प्रदीप गुजर या कवीने, त्याच्याच पिढीतील काही कवींना वाव देण्यासाठी 'कविता' या अनियतकालिकाचे संपादन करणे व पुढे त्याच स्वरूपाच्या एका संकलनाचे संपादनही करणे यामागे हीच प्रतिसादाची भावना आहे. आमच्या पिढीतील एखाद्या संपादकाने ही निवड केली असती का? त्याला ही कविता इतकी भिडली तरी असती का? कोण जाणे. पण आजच्या वाचकाला आवडणारी आजची कविता कोणती हे कळणे अगत्याचे आहे; कदाचित अधिक महत्त्वाचेही. कारण हा वाचकही नवे घेत घडलेला आहे. त्याबद्दल तक्रार नाही. प्रश्न इतकाच की कवितेने इतके 'समकालीन' असावे का? तिने जवळ जरासे पूर्वकालीनही बाळगायला हवे असे मला वाटते. सरमिसळ असावी. जुनी केंद्रे

पार बुजलेली नसावीत. त्यांच्यातून उद्भवलेले एखादे स्पंदन जाणवले तर आज काय घ्यायचे यासंबंधी एक वेगळी जाण, दृष्टी येईल. त्या घेण्यात अगतिकतेचा, क्रमप्राप्तीचा भाग कमी असेल. या भूमिकेमुळे 'कविता' वाचल्यानंतर माझ्या मनात प्रथम आलेला विचार हा की नव्या वाटांनी पुढे जात असतानाच कधीतरी मागे जाऊन थेट जुन्या कवींना भिडणारा, त्यांचे चलनवलन सुरू करणारा एखादा कवीही आता निर्माण झाला पाहिजे. 'कविता' या संग्रहात त्याची उणीव जाणवते.

पण ही उणीव असली तरी या संग्रहात जी कविता वाचायला मिळते तीही महत्त्वाची आहे, काही नव्या जाणिवा देणारी आहे. या जाणिवांची ओळख करून घेण्यापूर्वी ही कविता लिहिणाऱ्या कवींची आतापर्यंतची वाटचाल कशी झाली आहे हे पाहिले पाहिजे. एकदोन अपवाद वगळता बहुतेकांची सुरुवात गेल्या सातआठ वर्षांतील असावी. त्यातील आधीची दोनतीन वर्षे त्यांचे नाव एका विशिष्ट वर्तुळातच परिचित असणार; कॉलेजचे भित्तिपत्रक किंवा नियतकालिक यांतच चमकले असणार. पण या थोड्या खाजगी प्रसिद्धीची उमेद वाढायला मदत होत असते. त्या उमेदीतूनच त्यांना एखाद्या वाङ्मयीन नियतकालिकाकडे आपले लेखन पाठवावेसे वाटले असणार. तेथे नेहमीच स्वागत झाले असेल असे नाही. पण ती निराशा कमी करायला एकदोन अनियतकालिके होती; 'महाराष्ट्र टाइम्स'ने नवोदित कवींसाठी आखलेल्या काही योजनाही होत्या. त्यामुळे या अवस्थेत वाटणारी प्रसिद्धीची मानसिक गरज पूर्ण होत राहिली, लेखनही चालू राहिले. आता आणखी काही नव्या योजना आल्या आहेत. उदाहरणार्थ, ही संकलने प्रसिद्ध करण्याची योजना, किंवा नवलेखकांच्या पहिल्या संग्रहांना अनुदान देण्याची साहित्य संस्कृति मंडळाची योजना. त्यामुळे अलिकडे मराठी वाङ्मय मंडळ ते साहित्य संस्कृति मंडळ हा प्रवास पुष्कळच वेगात होतो! हा वेग विकासाला हितकारक आहे काय? याचा अर्थ कवीने वर्षानुवर्षे प्रसिद्धीची वाट पाहात झुरावे असा नाही. पण ती प्रसिद्धी सुलभपणे मिळू लागली की आत्मविश्लेषणाला लागणारा वेळ कमी होतो. याचे काही तोटे असतात. एक तोटा असा की एका ठिकाणी चमकदार वाटणारी कविता दुसऱ्या ठिकाणी तशी का वाटत नाही, हा विचारच मनातून निघून जातो. भित्तिपत्रकाचे क्षेत्र वेगळे; आणि एखाद्या वाङ्मयीन नियतकालिकाचे क्षेत्र वेगळे. दोन्ही ठिकाणची संगतसोबतही वेगळी. वेगवेगळ्या सोबत्यांत उठून दिसले पाहिजे. त्यासाठी एक वेगळे व्यक्तिमत्त्व असले पाहिजे. पण ते आहे की नाही हे शोधण्यासाठी, ते घडविण्यासाठी सवड कुठे उरलेली असते? वेगात लेखन होत असते; काय फेकले पाहिजे आणि काय बाळगले पाहिजे याचा विचार होत नाही. त्यामुळे जे अनावश्यक आहे ते तसेच रेंगाळत राहते आणि शेवटी मुरतेही! या वेगात, दोन प्रतिमांची परस्परांशी स्पर्धा चालू असते. एक कवीची, जिच्यावर कोणतेही नियंत्रण नाही अशी, प्रतिमा; आणि दुसरी कवी, काही वृत्तींच्या आहारी जाऊन, तयार करत असलेली प्रतिमा. दोन्ही अनाकर्षक. त्यांचा संयोग करणे, त्यांच्या-

वर संस्कार करणे कधी कधी कायमचे राहून जाते. 'कविता'मधील सगळयाच कवींची या नवोदितांच्या प्रश्नांतून सुटका झाली आहे असे नव्हे. पण काहींची झाली आहे, आणि उरलेले, ते प्रश्न समर्थपणे हाताळू शकतील असे आहेत. ही जाणीव सुखद आहे.

ही कविता एकत्रितपणे वाचताना आणखी एक जाणीव होते : या कवितेचा एकंदर सूर पुष्कळच मंद आहे. सूर मंद तशी गतीही मंद. उसळून, उन्मेखून बोलण्याचे तिने जवळजवळ सोडून दिले आहे. या संग्रहातील, वेगवेगळे अनुभव व्यक्त करणाऱ्या काही ओळींचा येथे निर्देश करता येईल : 'श्वासात मोगऱ्याच्या' या कवितेत अशोक बागवे म्हणतात, 'मी गावयास बसता, गेले उठून कोणी'. 'झाड' या कवितेत रवीन्द्र लाखे यांचा प्रश्न आहे : 'आता ह्या एकाएकी उन्मळून पडलेल्या झाडाचं काय करायचं ?'. 'रुळावरून चंद्रकोर' या नरेन्द्र बोडके यांच्या कवितेत 'जगण्यामरण्याच्या दरम्यान, अणकुचीदार भाल्यांचे एक कुंपण असावे, अशी माझी खात्री आहे' हे विधान तीन ओळींत येते. सुनंदा भोसेकर आपली व्यथा खालील ओळींतून व्यक्त करतात :

> ऐन उमेदीच्या दिवसांत ही स्थिती
> मग माझ्या पाखरांना पंख फुटल्यावर
> मी काय करावे ?
> हे अस्ताला जाण्याआधीच
> तू सांगितले असतेस
> तर बरे झाले असते...

ज्यांचा एखादा संग्रह प्रसिद्ध झाला आहे किंवा प्रसिद्धीच्या वाटेवर आहे असे हे कवी आहेत, म्हणून त्यांची निवड केली. त्यांच्या ओळी मात्र फार विचारपूर्वक निवडलेल्या नाहीत. तसे करण्याचे कारणच नाही. एकूण प्रकृतीच मंद बोलण्याची असेल तर कोणत्याही ओळीत तोच सूर डोकावणार नाही का ? कोणी प्रतिसादाच्या प्रतीक्षेत; कोणी आकस्मिक विध्वंसाचा साक्षी, कोणी जन्ममृत्यूविषयी चिंतनमग्न; कोणी भविष्याविषयी संभ्रमात. अनुभव नवा नाही, पण सूर नवा आहे. पूर्वी ते तीव्र, चढ्या सुरात व्यक्त केले जात. आता ते आधी स्वीकारले जातात आणि मग व्यक्त होतात. हा समंजसपणा की अकाली आलेला प्रौढपणा ? हा सूर स्वाभाविक की कमावलेला ?—वगैरे शंका कदाचित निर्माण होतील. पण त्या अनाठायी आहेत. कारण जिची उत्कटता थोडी कमी झाली आहे अशी ही पिढी आहे. तो ती ज्या अनिश्चित, अस्थिर युगात वाढत आहे त्याचा परिणाम आहे. त्यामुळे सगळ्या-संबंधीच एकप्रकारची परकेपणाची भावना आहे. स्वतःसंबंधी तशी इतरांसंबंधीही. 'केले जरी खुलासे त्यांनी पवित्रतेचे, आतून बाटलेली असतात सर्व हाडे' हाच श्रीकृष्ण राऊत यांच्याप्रमाणे इतरांचाही अनुभव आहे. 'ही गिधाडांची सुबत्ता,

कळप हे तर सामिषांचे !' (विजया जहागीरदार) या उद्गारातून दुजोरा मिळतो. पण त्यामागे संताप आहे का ? येथे केशवसुतांची आठवण करून पाहावी. नंतर नारायण सुर्व्यांची. त्यांच्या सुरात निषेध व्यक्त होत नाही; बंडाचा पुकाराही केला जात नाही; कारण हा एक सर्वत्र चाललेल्या क्रूर खेळाचाच एक भाग या अलिप्त वृत्तीने त्याकडे पाहिले जाते. फार गुंतण्यात अर्थ नाही हा निर्णय असतो. मग या युगात एखादा केशवसुत किंवा एखादा बोरकर कसा निर्माण होणार ?

या अलिप्त, तटस्थ वृत्तीचा परिणाम, या कवींच्या निर्मितिप्रक्रियेवरही झाला असल्यास नवल नाही. भावनावेग अनावर असला की त्याचा परिणाम आविष्कारावरही होतो; 'फेस भराभर उसळतो.' त्याचे म्हणून एक सौंदर्य असते. कधी या उसळण्यात शब्दांविषयीची बेफिकिरी, कधी शब्दांविषयीचे प्रेम, तर कधी नुसतेच शब्दप्रभुत्व सहभागी असते. 'कविते'त त्यातले काहीच दिसत नाही. हे म्हटले तर चांगले आहे, म्हटले तर वाईटही आहे. पण नाइलाजच आहे. मंद सुरात बोलायचे तसे कमी बोलायचे हेही जणू ठरून गेल्यासारखेच आहे. इंग्रजीत ज्याला deadpan म्हणतात तसे हे बोलणे. काही उदाहरणे पाहा : (संवाद नाही.) 'अशातही आपण रोज भेटत आहोत, याचा अर्थ काय ?' (प्रकाश कार्लेकर); 'आज एकाच वेळी एक मंदिर ढासळताना, आणि एक फूल कोमेजताना पाहिले' (भारती बिर्जे); 'इतके दिवस आपणच दुःखी होतो. बरे झाले, आता सारेच दुःखी झाले' (पुष्पाग्रज); 'आपण आपल्या प्रतिमा वगैरे मोडून टाकून, आपल्या नात्याची नव्याने सुरवात करायची का ?' (आनंद कुमठा). या शैलीमुळे कवितेतील 'मेलोड्रामा' अलिकडे कमी झाल्यासारखा वाटतो; साधेपणा जाणवतो. हे चांगलेच आहे. पण साधेपणाबरोबर आला पाहिजे तो नेमकेपणा कोठे आहे ? आधी न भारावणे आणि म्हणून न भारावता लिहिणे ठीक. पण भारावल्यानंतरही न भारावता लिहिणे कोठे आहे ? दिलीप पुरुषोत्तम चित्रे, पु० शि० रेगे वगैरे कवींची या ठिकाणी आठवण येते. त्यांची आविष्कारशैली आता दुर्मिळ का व्हावी ?

त्यामुळे एक दुष्टचक्रही चालू झाले असावे अशी शंका येते. भावनावेग नाही म्हणून शब्दवेग नाही; पण त्यामुळे 'शब्ददारिद्र्य' वाढू लागते. ते झाकण्यासाठी काही अनुभव नाकारावेच लागतात ! काळाबरोबर गळणारे काही अनुभव असतात. ते या कवितेत नसणार हे समजू शकते. पण प्रेम, निसर्ग यांच्यासारखे इंद्रियसंवेद्य अनुभव ? 'मनात माझ्या मुळीच काही नाही' यांसारखा एखादा अनुभवाचा 'थेंब' ? 'पोसवलेली केळ म्हणाली' यासारखे एखादे गूढ निःश्वसित ? 'मधेच त्याचे शब्द भारावले' ही मनोवस्था ? हे जाणवत नसेल असे नाही. पण ते बाहेर ठेवले जाते. कारण ते आपल्या शब्दांतून उमटू शकेल की नाही याची खात्री नसते. त्यामुळे झोकून देऊन अनुभव घेण्याच्या प्रवृत्तीवरही बंधने येतात. अनुभवक्षेत्र आपोआपच आकुंचन पावते. हे घडू द्यायचे नसेल तर पुन्हा एकदा 'शब्दांनो,

मागुते या' अशी साद घातली पाहिजे. 'दूर देशास गेलेले' शब्द जर माघारी परतले तर हे दुष्टचक्र थांबेल कदाचित; अनुभवक्षेत्र अधिक मोकळे होईल.

या कवितेत व्यक्त झालेले प्रमुख अनुभव कोणते आहेत? हे अनुभव प्रातिनिधिक आहेत असे मानून त्यांचे विश्लेषण करायला हरकत नाही. केंद्रीभूत अनुभव एकटे-पणाचा आहे. तो अनेक कवींच्या कवितांतून व्यक्त झाला आहे. त्या एकटेपणाला विविध संदर्भ आहेत : कधी स्वतःचा स्वतःशी, इतरांशी संवाद होऊ शकत नाही म्हणून एकटेपण येते :

जवळचे शब्द संपून गेल्यानंतर
ते तिघेही
स्वतःच्या परक्या होत चाललेल्या
सावल्या न्याहाळीत उठले

(नीलकंठ कदम)

कधी संवाद होत नाही, तर कधी ओळखच पटत नाही. स्वतःचा चेहरा हरवल्या-सारखा वाटतो :

आपणच आपल्या बाहेर पडल्यानंतर
येणारं परदेशीपण...
ओळख पटत नाही
त्याला आपला चेहरा कसं म्हणायचं?

(हरिश्चंद्र थोरात)

कधी भोवतीचे काहीच आपले वाटत नाही :

एका विस्तिर्ण सभागृहाच्या एका कडेला
मी बसून आहे कधीचा.

(अरुण म्हात्रे)

या एकटेपणाला कोणत्याही रोमँटिक छटा नाहीत. ते खरे आहे, काहीसे वैचारिक स्वरूपाचेही आहे. त्या एकटेपणापेक्षाही त्याचे संदर्भ महत्त्वाचे आहेत. संवादाचाच प्रश्न घ्या. संवाद होऊ शकत नाही हे नीलकंठ कदम यांच्याप्रमाणेच इतर अनेकांनी बोलून दाखवले आहे. काही वेळा संवाद करण्याचा, बोलण्याचा प्रयत्न पोकळ, अर्थहीनही वाटतो.

या सगळ्यामुळे विफल वाटते. 'जिंकून हारलो मी सारेच डाव तेथे' (श्रीकृष्ण राऊत); 'अशा उदास रात्री आपल्याच प्रेतापाशी मुकाट्याने बसून रहावे' (हरिश्चंद्र थोरात); 'तुला पंखांचे वेध लागलेत, नी मला, पाय कापल्यानंतरच्या वेदनांचे!'

(श्रीदेवी देसाई); 'आपलं तसं या आयुष्यात कुणीच उरलेलं नाही' (वाचा आत्मसिद्ध); 'मी इथे सुकले फुलोनी, पथि कुणी वळलेच नाही' (विजया जहागीरदार) वगैरे उद्गार वैफल्यापोटीच निघाले आहेत. हे वैफल्य काहीसे वैयक्तिक असले तरी काही प्रमाणात भोवतालचे आयुष्यही त्याला जबाबदार आहे. या आयुष्यात पडझड दिसते. वादळामुळे घरे पडतात, फक्त त्यांचे सांगाडे उरतात; लालभडक फळांत कावळे चोची खुपसतात; झाडे एकाएकी उन्मळून पडतात. हे सातत्याने पाहिल्यानंतर वाटते,

माझ्या अस्तित्वाला पडलेले प्रचंड खिंडार
कळत कळत कळत आतल्याआत.
आणि माझे रक्तबंबाळ हात, पाय, शरीर, शब्द.
दुःख, रस्ते, गाभारे.
तळयाभोवतीचा पार...तळे...जाळी कमळांची.
(अरुण म्हात्रे)

वैफल्य असे भराभर पसरू लागते.

पण हे कवी त्या वैफल्यात विरून जात नाहीत. भविष्याचा विचार मागे उरतोच. तो एक वेगळा धीर, आधारही देतो :

भविष्याची दैवी अनपेक्षिता अंगातून चमकून गेली
साक्षात्काराप्रमाणे, संगीताप्रमाणे. संगीताप्रमाणे—
अस्तित्वाचं प्रवाही लावण्य मला जाणवलं आणि
त्याची स्वयंसिद्धता; निराकार वस्तूंना लाभत
राहणाऱ्या अनपेक्षित घनतेसारखी.
(रा० वा० कदम)

मग अस्तित्वाचा, 'सृजनशील व्यवस्थेचा' एक वेगळाच अर्थ भावू लागतो. 'सूर्य मातीत चिणला' म्हणून काय झाले? मनात पूर्ण उमललेल्या सूर्यफुलाला मातीच्या दिशेने मान तुकवता येतेच. (सूर्यफूल : नरेन्द्र बोडके.); धूसर काळोखात ढिगाऱ्यावर 'ती मुलं' काहीतरी शोधत राहतातच (ती मुलं : नीलकंठ कदम).

निर्व्याज, निरागस राहिले तरच हे जमते. म्हणूनच निरागसपणाचे इतके अप्रूप वाटते :

घनदाट जंगलातून बाहेर पडलेली नाचरी वाट...
मृत्युंजयी पाउलखुणा जपणारी
आणिक वरचा एक निळा नितळ तुकडा...
पाखरांच्या पंखांचे उडते गालबोट नसलेला.
सगळयांनाच इतकं निर्व्याज कसं राहता येतं?
(श्रीदेवी देसाई)

स्वतःला हेच आत्मसात करायचे असते. 'खेचरांच्या असमंजस डोळ्यात मुके पूर्णविराम' ठेवायचे असतात (भारती बिर्जे). म्हणूनच, सगळे रंग मनाजोगते भरून झाल्यावर 'सहजतेने पाटी झर्रकन पुसणाऱ्या' मुलीचाही हेवा वाटत राहतो. (आनंद कुमठा).

हे वैफल्य रोमँटिक नाही आणि हा आशावादही नुसताच आदर्शवादी नाही. दोहोंचीही मुळे आजच्या जीवनात आहेत. पण हे मान्य केल्यानंतर एक शंकाही बोलून दाखविली पाहिजे : हे शंभर टक्के अनुभवजन्य आहे का ? की 'अस्तित्व', 'आयडेन्टिटी', 'नॉन-बिलाँगिंग', 'कम्युनिकेशन' इत्यादी संकल्पना, त्यांच्याविषयीचे तत्त्वज्ञान यांच्याशी असणाऱ्या तात्त्विक ओळखीतून ते उद्‌भवले आहे ? त्यालाही हरकत नाही. पण मग ती ओळख पक्की असायला हवी. या संकल्पनांचे समर्थपणे ग्रहण करण्याइतकी परिपक्वता या कवींच्या पिंडात आहे असे सध्या तरी वाटत नाही. पुढेमागे हे घडेलही. त्यानंतर या कवितेला चिंतनाचे परिमाणही आपोआप येईल. सध्या त्याची उणीवही जाणवते.

भोवतीच्या जगात विध्वंस आहे तसे क्रौर्यही. सबंध अस्तित्वाला खाऊन टाकणारे क्रौर्य.

काळसर पडत जाणारी तीक्ष्ण धार
आणि हिरव्या जमिनीवर टपटपणारी कीड
आता घट्ट दातांच्या क्रूर तयारीनं
सबंध अस्तित्वाकडेच वाटचाल करू लागते.

(अरविंद विश्वनाथ)

क्रौर्य थैमान घालत असते. त्यामुळे कधीकधी पराभूतही वाटते. पण मग जाणवते :

कोत्या पराभवाचे वार्धक्य नाव आहे
आता नव्या दमाचे जळते जवान शोधा.

(अशोक बागवे)

हे आव्हान नाही; हे फक्त सांगणे आहे. सर्वांना नव्हे, आपल्या पिढीतील मंडळींना. ही 'समकालीन' कविता मुख्यतः समवयस्कांसाठीच लिहिलेली आहे. त्यामुळे ती इतरांना समजली, भिडली नाही तर दोष आमचा नाही, आम्हांला त्याचे दुःखही नाही, असेही हे कवी म्हणू शकतील. पण त्यांची ही भूमिका नेहमीच विवाद्य राहील. कारण कवितेचे आवाहन सर्वांना असले पाहिजे. या संग्रहातील काही कविता सर्वांसाठी आहेतही.

जरा वर, कालमानाप्रमाणे काही अनुभव गळण्याचा उल्लेख केला. अनुभव गळतात तसे दृष्टिकोणही बदलतात. या बदलांचा संबंध सामाजिक बदलांशी असतो.

गेल्या तीसचाळीस वर्षांत स्त्रीचे समाजातील स्थान बदलले; त्यानुसार तिने एक नवे व्यक्तिमत्त्व धारण केले. स्त्रीपुरुषसंबंधाचे स्वरूपही, साहजिकपणेच, बदलले. स्त्रीचे उदात्तीकरण व तत्सम काही गोष्टी संपुष्टात आल्या. याचा परिणाम प्रेमकवितेवर झाला असल्यास त्यात नवल काय ? 'कविता'मधील काही ओळींत याचे प्रत्यंतर येते. 'सहा तारांवर छेडलेले', 'या गडद जांभळ्या अवेळी', 'अपार एकाकी' वगैरे कविता या दृष्टीने पाहाव्या. साफल्य असो वा वैफल्य, संयोग असो वा वियोग, काही समान मानसिक प्रश्न आहेत, आणि त्यामुळे निर्माण झालेले एक बरोबरीचे नाते आहे. त्यामुळे या प्रेमकवितांत दिसतात ती दोन स्वतंत्र व्यक्तिमत्त्वे. प्रेमानुभव या व्यक्तिमत्त्वाच्या इतर काही अंगांसकट व्यक्त होत असतो. साहजिकच तो निखळ नसतो. त्यामुळे त्या रूढ अर्थाने प्रेमकविता वाटत नाहीत. आजचा कवी इतर अनुभवांना अग्रक्रम देताना आढळतो; जेव्हा तो प्रेमकविता लिहितो तेव्हाही ती 'संमिश्र' स्वरूपाची असते. या दोन कारणांमुळे प्रेमकवितांचे प्रमाण कमी झाल्यासारखे वाटते. 'ती तर अजून रंगून गुंगून' (प्रकाश कार्लेकर).—यासारखी कविता आता कालबाह्य वाटते.

याचा अर्थ तशी कविता आता लिहिली जात नाही असा नव्हे; ती लिहिली जाऊ नये असेही नव्हे. रंजना विगम यांच्या कवितांचा या संदर्भात उल्लेख करावासा वाटतो. ती कविता 'छंदोबद्धते'मुळे लक्ष वेधून घेते तशी तिच्यातील जुन्या जगाचे स्मरण देणाऱ्या वातावरणामुळेही. तिच्यात, जुन्या कवितेतील स्त्रीची प्रतिमा उमटली आहे. कवितेची मुळे ग्रामीण जगात आहेत म्हणून हे झाले असेल का ? पण तसे म्हणावे तर पोपट सातपुते यांच्या 'सात गाथां'चे काय ? त्यातील काही गाथांना निश्चितच आधुनिक वळण आहे. 'रानस्वर आणि सावल्या' या दीर्घ कवितेत विशिष्ट प्रादेशिक वातावरण जातिवंतपणे उभे करणारे सातपुते, 'गाथां'त त्या वातावरणातून बाहेर पडतात, त्यापलिकडच्या जगाशी, त्यातील भावनाविचारांशी संवाद साधतात. हे कसे घडते ? उत्तर कठीण नाही. कवी ग्रामीण आहे की नागर हा प्रश्न नसतो; त्याचे मन ऊर्मीने, आंतरिक ओढीने कशाशी संवाद साधू शकते, हे महत्त्वाचे असते. हे वैचारिक-भावनिक लागेबांधे कोणत्याही तर्कशास्त्राशी निगडित नसतात. काही वेळा प्रदेशाच्या मर्यादा पार करता येतात; मूळ प्रादेशिक बैठक न सोडताही हे शक्य होते.

राजस कल्याणकर यांच्या कवितांचा रागरंग शहरी आहे; शहरी कोलाहल, शहराने निर्माण केलेले प्रश्न, शहरी स्त्रीजीवन. स्त्रीची वेगळी प्रतिमा या ठिकाणी दिसते. थोड्याफार फरकाने, या संग्रहातील सगळ्याच कवयित्री, आपल्या कवितांतून या वेगळ्या प्रतिमेचे प्रक्षेपण करतात. कवयित्रींची इंदिराबाईंभोवतीच रेंगाळणारी कविता आता एक नवी दिशा घेऊ पाहत आहे असे जाणवते. स्त्रीला लाभलेल्या नव्या व्यक्तिमत्त्वाचा, तिला उपलब्ध झालेल्या नव्या अनुभवक्षेत्राचा तो परिपाक आहे. या दिशेने

किती पुढे जाता येईल हे वैयक्तिक ताकदीवर अवलंबून आहे. त्या ताकदीबद्दल आत्ताच विधाने करण्यात अर्थ नाही. कारण तिचा पुरा अंदाज अजून या कवयित्रींनाच आलेला नाही. मग इतरांना कोठून येणार ? कुतूहल मात्र वाटते : अशा प्रकारच्या कवितेला विकासाच्या शक्यता किती ? काळामुळे घडत गेलेले व्यक्तिमत्त्व घेऊन लिहिणे चांगले की व्यक्तिमत्त्वातील कालनिरपेक्ष घटकांचा आधार घेणे चांगले ? त्या घटकांचे आजच्या कवि-कवयित्रींना भान आहे काय ? स्फूर्तीचे फार स्तोम माजवू नये हे खरे. पण कविता फारच कालसापेक्ष झाली तर कवितालेखन वाजवीपेक्षा अधिक casual होऊन जाईल काय ? परिणामी कविता आपले 'कवितापण' गमावून बसेल काय ?

हे कवितापण अनुभवात सामावलेले असते तसे आविष्कारातही. त्या आविष्काराविषयीही काही निरीक्षणे करणे शक्य आहे. मुक्तछंदाच्या आगमनाला पंचेचाळीस वर्षे उलटल्यानंतर, नव्या कवितेतील छंदविषयक अज्ञानाबद्दल तक्रार करणे हे कदाचित जुनाटपणाचे वाटेल. पण तरीही, ती ठासून करावीशी वाटते. छंद हे कवितेचे सर्वस्व नाही; छंदात लिहिले जाते ते सगळे काव्य असेही नाही. पण छंदात शिस्त असते. ती काव्याला उपकारकच ठरत असते. एकदा ती शिस्त लागल्यावर छंदाचे जोखड उतरवायलाही हरकत नाही. पुढील टप्प्यापाशी शिस्तीसाठी आणखी काही मार्ग दिसतील, कदाचित ती अंगी बाणूनही जाईल. पण एक प्राथमिक उपाय म्हणून तरी छंदाचा अभ्यास करायला काय हरकत आहे ? तो अभ्यास काव्यातील लयीसंबंधीही वेगळी दृष्टी देऊन जाईल. त्यातून महत्त्वाची गोष्ट ही की, बंधनात राहिल्याखेरीज ती का झुगारायची हे कळत नाही; आणि ती संपल्याचा आनंद पुरेपूर उपभोगता येत नाही ! मुक्तछंदाचा किंवा मुक्तशैलीचा आज जो वारसाहक्काने उपयोग केला जात आहे तो इष्ट नाही. नव्या कवीने थोडे स्वावलंबन शिकले पाहिजे. स्वातंत्र्य स्वतः मिळवलेले असले की त्याची किंमतही अधिक कळते; त्याचा दुरुपयोग सहसा होत नाही. आज तो दुरुपयोग वेगवेगळ्या स्वरूपांत दिसतो. एखाद्या अतिक्षीण अनुभवावरही दहा-पंधरा ओळींची कविता लिहून टाकलेली दिसते. लिहिणे सोपे झाल्याकारणाने, ते लिहिण्याजोगते आहे की नाही याचा सूक्ष्म विचार होत नाही. लिहिणे सोपे झाल्यामुळे नेमकेपणा, बांधीवपणाही आढळत नाही. एखाद्या कवितेतील काही शब्दांचे, काही ओळींचे स्थानच नेमके सापडत नाही. त्यांनी नुसतीच जागा व्यापली आहे असे वाटत राहते. काही वेळा तर जे आडवे लिहायचे ते उभे लिहून ते काव्य असल्याचा फक्त आभास निर्माण केलेला आहे असाही संशय येतो. एका निराळ्या प्रकारचे पद्यीकरण ! त्यामुळे कवितेचा आकृतिबंध, लय—अशा अनेक गोष्टी गोत्यात येतात. या मोकळ्या लेखनाचे, त्यात अनावरपणा, बेफिकिरी यांतील काहीच जाणवत नसल्यामुळे त्या प्रकारे समर्थनही करता येत नाही. येथे 'कविता'-

मधील उदाहरणे मुद्दामच दिलेली नाहीत. कारण या सगळ्या त्रुटींचा कच्चेपणाशीही संबंध असू शकेल. या कच्च्या अवस्थेतच त्यांनी थोडे प्रशिक्षण घेतले तर ते त्यांच्या कवितेच्या विकासाला पोषक ठरेल. ज्यांनी ही अवस्था ओलांडली आहे, असे अशोक बागवे, रवींद्र लाखे, नरेंद्र बोडके हे कवी लय, आकृतिबंध या गोष्टींचे भान दाखवतात ही आनंदाची गोष्ट आहे. पण तेही छंदाबाबत थोडे उदासीनच दिसतात. असे का ?

'कविता 'मधील गझल वाचताना हे अधिक तीव्रतेने जाणवते. बहुतेक गझलांतून, त्याच्या बांधणीचे, वजनाचे भान दिसत नाही. छंदोभंग अनेकदा होतो. गझलात शब्दकलेचे वेगवेगळे ढंग दिसले पाहिजेत, ते दिसत नाहीत. भाषेचे स्तोम माजवू नये, पण भाषा आली पाहिजे. ती वाकवण्याची, तिच्यात भर टाकण्याची जिद्दही असली पाहिजे. नव्या कवितेची भाषा एकंदरीने बोथट आहे. ती गद्याच्या फार जवळ आली म्हणून ? तसे असेल तर वेळीच अंतराची जुळवाजुळव करणे बरे. गझलासारखे प्रकार हाताळताना हे करायला अवसर असतो. गझल वाचताना मनात आलेले आणखी एकदोन प्रश्न : कवितेचा लिरिकल सूर आता प्रामुख्याने गझलातच का सापडावा ? अन्यत्र तो हरवल्यासारखा का व्हावा ? दुसरा प्रश्न असा : एरवी छंदोबद्ध लेखनाचे वावडे असलेले काही कवी गझल का लिहितात ? यामागे थोडी भरपाई करण्याची भावना आहे की गझलातील लिरिसिझमचे, उपरोधाचे थोडे ढोबळ स्वरूप त्यांना अधिक मानवते आहे ? खटके, कसरती, त्यामुळे निर्माण होणारा त्वरित परिणाम यांच्या फार आहारी न जाण्याची सावधगिरी या कवींनी बाळगली पाहिजे.

गद्याच्या जवळ गेलेली, सैलपणे लिहिलेली ही कविता कळायला इतकी अवघड का, हा एक प्रश्नच आहे. काही प्रतिमांचा अर्थ समजत नाही; ओळींतील दुवे काही वेळा सापडत नाहीत; बहुतेक कवितांचे काहीसे खटकेबाज शेवट नेमके काय सुचवतात हे कळत नाही. यात वाचकाकडे अजिबात दोष येत नाही असे नाही. त्याला विशिष्ट प्रकारची कविता वाचायची सवय झालेली असते. नवे वळण त्याला चटकन आकर्षून घेऊ शकत नाही. दूरता राहते, कवितेच्या अंतरंगाकडे नेणारी वाट चिंचोळी होते. नव्या कवीचा अनुभव समजून घेतला पाहिजे हेही काही वेळा सुचत नाही. पण हे सगळे करूनही जेव्हा कविता दुर्बोधच राहते तेव्हा काय करायचे ? ही नवी दुर्बोधता आहे. कमी सांगितल्यामुळे दुर्बोधता निर्माण होते, तशी अधिक सांगितल्यामुळेही. प्रत्येक शब्द महत्त्वाचा आहे असे आपण धरून चालतो आणि तो तसा नसतो. मग गोंधळ होऊ लागतो. असंबद्ध आणि गैरलागू यांतील फरक समजेनासा होतो. वाचताना नुसताच वेळ वाया जात आहे असे वाटत असले की कवितेचे आव्हानही कमी होते. कवितेचे आवाहन व आव्हान कसे वाढेल यासंबंधी तरुण कवींनी आता आस्थेने विचार केला पाहिजे. अर्थाभोवती

तट उभारण्याची प्रवृत्ती अलिकडे इतकी वाढली आहे की एके काळी भाबडेपणाने बोलणारी ग्रामीण, आणि कालपरवापर्यंत थोडी वाचाळ वाटणारी दलित कविताही आता आढेवेढे घेऊ लागली आहे! त्यावरून आठवले : 'कविता' या संग्रहात ग्रामीण कविता कमी का ? आणि दलित कविता अजिबात का नाही ? संपादकाची अभिरुची व तीनुसार त्याने केलेली निवड हे मान्य करूनही, ही गोष्ट खटकते. कवितेने फार शिष्ट, नागर असू नये—आणि केवळ तशा वाचकांसाठीच तिचे अस्तित्व असू नये.

'कविता' वाचल्यानंतर मनात आलेल्या काही गोष्टींची येथे नोंद केली आहे. कौतुक आहेच; पण त्याबरोबरच काही तक्रारीही आहेत. त्या जरा कठोरपणेच केल्या आहेत. नुसतेच उत्तेजन देणे हा या कवींचा अपमान ठरेल. त्यांना त्याची गरज नाही. गरज आहे ती विश्लेषणाची. हे विश्लेषण करण्यास त्यांना थोडी मदत करावी हा हेतू. काही गोष्टी त्यांना पटतील, काही पटणार नाहीत. पटतील त्या स्वीकाराव्या, पटणार नाहीत त्या सोडून द्याव्या. लिहीत राहावे...लिहिता लिहिता वाढत राहावे. त्याइतके महत्त्वाचे दुसरे काहीच नाही!

—विजया राजाध्यक्ष

**अशोक बागवे :** ३, विनायक-प्रसाद, चेंदणी, आर. एस. रोड, ठाणे (प.) ४००६०१ मराठी विषयात एम्. ए. रुइया महाविद्यालयात अध्यापनाचे काम. मौज तर्फे 'आलम' हा काव्यसंग्रह प्रकाशित. डॉक्टरेटचा अभ्यास चालू.

**श्रीकृष्ण राऊत :** द्वारा अकोला जिल्हा मध्य. सह. बँक लि. मु. पो. बोरगाव मंजू, जि. अकोला ४४४१०२, एम्. कॉम. पूर्ण करून, मराठी विषयात एम्. ए. भाग २ चे अध्ययन सुरू.

**रामचंद्र वामन कदम :** खो. नं. ११, प्रभु कॉटेज, मोगल लेन, माटुंगा, मुंबई ४०००१६. मराठी विषयात एम्. ए.

**प्रकाश कार्लेकर :** ७/५४ सेंट्रल गव्ह. हाउ. सोसा०, घाटकोपर (पश्चिम), मुंबई ४०० ०८६. मराठी विषयात एम्. ए. 'व्यंजना' मासिकाचे संपादक. 'लोकराज्य'चे उपसंपादक.

**राजस कल्याणकर :** ६४ इ, परळगांव, मुंबई ४०० ०१२. खेतवाडीमधील बी. इ. एस. महाविद्यालयात इंग्लिश व मराठीच्या अध्यापनाचे काम. डॉक्टरेटचा अभ्यास चालू.

**नीलकंठ कदम :** १८४ जे, धारावी कोळीवाडा, शीव, मुं. ४०० ०१७. मराठी विषयात एम्. ए. चे अध्ययन चालू.

**हरिश्चंद्र थोरात :** मोहन केणींचे घर, घर क्रमांक ४६९, तळमजला, मारुतीनगर, न्यू कळवा हायस्कूलच्या पाठीमागे, कळवा, जि० ठाणे. मराठी विषयात एम्. ए. चांदीबाई हिम्मतलाल मनसुखानी महाविद्यालय, उल्हासनगर येथे मराठीचे अध्यापन.

**श्रीदेवी देसाई :** य ४/५१, सरकारी अधिकारी वसाहत, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०००५१. मराठी विषयात एम्. ए. भाग २ चे अध्ययन सुरू.

**अरुण म्हात्रे :** ९/२७१ टागोर नगर, विक्रोळी, मुंबई ४०००८३. एम्. कॉम. पूर्ण करून कायदेविषयक अध्ययन चालू.

**नरेंद्र बोडके :** मराठी विभाग, महर्षी दयानंद कॉलेज, परळ, मुंबई ४०० ०१२. 'पंखपैल' काव्यसंग्रहास गोवा साहित्य अकादमीचे आणि महाराष्ट्र शासनाचे पारितोषिक. मराठी विषयात एम्. ए. एम्. डी. महाविद्यालयात अध्यापनाचे काम. वसंत दावतरांच्या मार्गदर्शनाखाली डॉक्टरेटचा अभ्यास.

**भारती बिर्जे :** अ/६५ कमलपुष्प सोसा. माहीम बांद्रा रेक्लमेशन, वांद्रे (प.), मुंबई ४०० ०५०. बी. कॉम. पूर्ण करून कायदेविषयक अध्ययन चालू.

**वाचा आत्मसिद्ध** (वामन चव्हाण) : ६/९८/२१०९ टागोरनगर, विक्रोळी (पूर्व) मुं. ४०००८३. मराठी विषयात एम्. ए. चे अध्ययन सुरू.

**सौ० विजया जहागीरदार :** ४, 'अवंती', नारायण दाभोळकर रोड, मलबार हिल, मुंबई ४०० ००६. मॅट्रिक. 'खडीसाखरेचे वेल' हा बालगीतांचा गाजलेला संग्रह.

**सुनंदा भोसेकर :** बी/१४ काशिनाथ नाखवा चाळ, महाराष्ट्र जनरल स्टोअर्सच्या समोर, गोखले रोड, नौपाडा, ठाणे २. 'अनोळखी प्रदेशात' हा काव्यसंग्रह प्रकाशित. एम्. ए. भाग २ (पॉलिटिक्स) चे अध्ययन.

**अरविंद विश्वनाथ :** (अरविंद विश्वनाथ कुलकर्णी) c/o य. गो. जोशी, दाबकी रोड, जोगळेकर प्लॉट्स, अकोला ४४४ ००१. बी. ए. चे अध्ययन.

**पोपट सातपुते :** संगमनेर महाविद्यालय, संगमनेर ४२२६०५. मराठी विषयात एम्. ए. संगमनेर महाविद्यालयात अध्यापनाचे काम.

**रंजना विगम :** विगम यांचा वाडा, ब्रह्मपुरी, जि. चंद्रपूर. मराठी विषयात एम्. ए. बी. एड्चे शिक्षण चालू.

**पुष्पाग्रज :** (अशोक नाईक) : घ. नं. १००, तळावली रोड, नावेली, मडगाव, गोवा. 'सलोखा' दिवाळी अंकाचे संपादक : मडगाव येथे स्वतंत्र व्यवसाय. बी. एस्सी.-पर्यंत अध्ययन.

**आनंद कुमठा :** इ/३ सारस्वत कॉलनी, लॅबरनम रोड, गावदेवी, मुं. ४०० ००७. बी. एस्सी. चे अध्ययन.

**रवींद्र दामोदर लाखे :** लेले वाडा, टिळक चौक, कल्याण. ज्यु. बी. कॉम. नंतर शिक्षण खंडित. Little Magazine च्या संदर्भात 'कोनटिकी' अनियतकालिकाद्वारे अत्यंत महत्त्वाचे संपादन. अनेक वाङ्मयीन हालचालींच्या विचारांचे उद्गाते.

REFBK-0023196

REFBK-0023196

**'कविता' अनियतकालिचे अंक, Little Magazine च्या अभ्यासकांना खालील ठिकाणी वाचनासाठी उपलब्ध होऊ शकतील :**

१. 'सत्यकथा' कार्यालय, गिरगाव, मुंबई

२. सतीश काळसेकर–२८, 'शिशिर', बामनवाडा, विलेपार्ले (पू.), मुंबई ४०० ०५७

३. प्रदीप गुजर–१, सुयोग, रामवाडी, नौपाडा, ठाणे २

४. प्रा. डॉ. प्रल्हाद वडेर–सेंटर ऑफ पोस्ट ग्रॅज्युएट, 'सुशीला', १८ जून रोड, पणजी (गोवा)

५. मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय (संदर्भ-शाखा), नायगाव, मुंबई

६. सेंट्रल लायब्ररी (संदर्भ शाखा), टाउन हॉल, मुंबई

७. मुंबई विद्यापीठ ग्रंथालय, मुंबई

८. महाराष्ट्र साहित्य परिषद ग्रंथालय, टिळकरस्ता, पुणे ३०

९. गोमंतक साहित्यसेवक मंडळ, पणजी (गोवा) ४०३ ००१

१०. महाराष्ट्र साहित्य सभा, ४८४ म. गांधी मार्ग, इंदूर (मध्यप्रदेश) ४५२००७

११. मराठवाडा साहित्य परिषद, सन्मित्र कॉलनी, औरंगाबाद ४३१ ००१

१२. श्री शिवाजी संदर्भ ग्रंथालय, विदर्भ साहित्य संघ, झाशी राणी चौक, नागपूर–१

१३. मराठी साहित्य परिषद–आंध्रप्रदेश, ४-६-४५८ इसामिया बाजार, हैदराबाद–५०० ०२७

2732
23996
१५४५८
काव्य